बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १६६ वा | मंगळवार दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## मावमच्या लोकसंचालित केंद्राची सभा व महिला मेळावा

# जिल्हा प्रशासन महिला बचत गटांना सहकार्य करणार-जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार





धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यात महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत महिला बचत गटांचे जाळे तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचलेले आहे.या महिलांनी छोट्या-मोठ्या उद्योगापासून महिन्याला एक महिला आज साठ हजार रुपये कमाई करत आहे.ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.विशेष म्हणजे शासकीय योजना सक्षमपणे राबविण्यामध्ये महिलांचा ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाटा आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास माविमच्या माध्यमातून आमच्याकडे प्रस्ताव पाठविल्यास त्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता दिली जाईल. त्यामुळे महिला बचत गटांना जिल्हा प्रशासन जी मदत लागेल ती मदत करण्यास आम्ही निश्चितपणे सहकार्य करणार.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

सोमवारी धाराशिव येथील कै.पवन राजे कॉम्प्लेक्समध्ये महिला व बाल विकास विभाग अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत माता सावित्री लोकसंचलित साधन केंद्र यांची चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी ते बोलत होते.यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक एस.बी. चिंचोलकर, मराठवाडा विभागीय सल्लागार संदीप मराठे,नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक चैतन्य गोखले,जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक चिन्मय दास,जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे,जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे, बारामती येथील हिंदुस्तान किड्सचे विस्तार व प्रशिक्षण विभाग प्रमुख शिरीष मिराशी,ट्रेनिंग स्पेशालिस्ट मुख्य कार्यकारी अधिकारी मेघा कश्यप यांच्यासह लोकसंचलित साधन केंद्र अध्यक्ष व इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री.पुजार म्हणाले की, बचत गटाची वार्षिक सर्वसाधारण सभा बचत गटातील महिला सण व उत्सवासारखे साजरा करतात,ही बाब खरोखर प्रेरणादायी व आनंददायी असून ते महिलांचे कर्तुत्व सिद्ध करते.आज जिल्ह्यामध्ये बचत गटांच्या महिला आपल्या उद्योगाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची उलाढाल करीत आहेत.फक्त उद्योग नाही तर त्या कुटुंबामध्ये सकारात्मक बदल घडवून आणत असल्याचे त्यांनी नमूद केले.विशेष म्हणजे अनेक महिला छोट्या उद्योगांच्या माध्यमातून दर महिन्याला ६० हजार रुपयापर्यंत उलाढाल करीत असून ही अतिशय प्रशंसनीय बाब तर आहेच, शिवाय त्या परिवाराला सावरण्याचे काम करीत आहेत.तसेच प्रधानमंत्री लखपती दीदी योजना सुरू असून या अंतर्गत सर्वच महिलांनी वेगवेगळे नवीन व्यवसाय सुरू केले तर वर्षाला मोठ्या प्रमाणात उलाढाल तर होईलच परंतू महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मोलाची मदत होणार असल्याची त्यांनी सांगितले.

बचत गटामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका निभावत असलेल्या दशसूत्री या कल्पनेचे या महिलांनी तंतोतंत पालन करून त्याची प्रत्यक्षात त्यांनी अंमलबजावणी केल्यामुळे या महिलांना बचतीचे व व्यवसायाचे गमक सापडल्याचे सांगून श्री.पुजार म्हणाले की,सर्वात महत्त्वाचे म्हणजे बचत गटातील महिलांनी बचत करण्याबरोबरच आपल्या पाल्यांना उच्च शिक्षण देऊन उच्च अधिकारी केले असल्याचा सर्वांना अभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले.आपला जिल्हा मागास म्हणजेच अविकसित असला तरी एका उद्योजकाने भाग्यश्री हॉटेलच्या माध्यमातून धाराशिव शेळीच्या मटणाला जगाच्या पातळीवर नेल्याचे त्यांनी आवर्जून विशेषत्वाने सांगत रेशीम शेती, पशुपालन फळ प्रक्रिया व विविध प्रक्रिया उद्योग उभारावे असे आवाहन पुजार यांनी केले.

प्रास्ताविक जिल्हा समन्वयक एस.बी.चिंचोलकर यांनी, सूत्रसंचालन लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापक श्रद्धा एडके यांनी व उपस्थितांचे आभार उपजीविका व्यवस्थापक अमर बनसोडे यांनी मानले.या कार्यक्रमास दीड हजारांहून अधिक महिला उपस्थित होत्या.

**यशस्वी महिलांचा पुरस्काराने सन्मान**

यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात उत्कृष्ट उद्योजक म्हणून तृप्ती पेठे,प्रज्ञा खंडाळकर,ज्योती गुरव,मंदा लांडगे,प्रमिला देशमुख, लतिका क्षिरसागर,हिना शेख,जुलैखा शेख व प्रेमा हावळे यांचा तर उत्कृष्ट सीआरपी म्हणून पूजा पवार,वंदना क्षीरसागर,वंदना सुर्यवंशी व दीपाली माने यांचा तसेच आदर्श माता म्हणून कल्पना देशमुख,शालिनी गायकवाड, संगीता अदाने,निर्जला तेरकर व रेखा सुरवसे यांचा आणि उत्कृष्ट गट म्हणून सद्गुरु,हिरकणी,अफसाना,प्रगती, अक्षरा,श्री,शांकभरी,अलिषा, शिवपार्वती जनाई,श्री गुरुदत्त,मौलाना व पंचशील महिला बचत गट तसेच उत्कृष्ट स्टाफ म्हणून संगीता घोडके यांचा आणि संयुक्तदायित्व गट म्हणून ईश्वरी,अमृततुल्य,पुष्पा,गौरी नंदन, संजीवनी,महालक्ष्मी श्री गुरुदेव आदींचा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

## क्राईम न्युज

### जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान वाशी पोलीसांनी दि.०७.०९.२०२५ रोजी १३.४५ वा. सु. वाशी पो ठाणे हद्दीत लांजेश्वर येथील मंदीरामध्ये छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-संतोष मच्छिंद्र कदम व इतर सहा इसम रा. लांजेश्वर ता. भुम जि. धाराशिव हे १३.४५ वा. सु. लांजेश्वर येथील मंदीरामध्ये तिरट मटका जुगाराचे साहित्य एकुण १,०५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले वाशी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

लोहारा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे श्रीहरी मार्डी ता. लोहारा जि. धाराशिव, शंकर रा.वडगाव दर्रे ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०७.०९.२०२५ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे छोटा हत्ती क्र एमएच एमएच १३ ए.सी. ६९३६ व रिक्षा क्र एमएच २३ एक्स २३०४ हे छत्रपती शिवाजी महाराज चौक व डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक लोहारा येथे समोर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना लोहारा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये लोहारा पो. ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

### मोबाइल फोन न देण्याचे कारणावरुन मारहाण

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत किरण , रा. साठेनगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.०६.०९.२०२५ रोजी साठेनगर जुन बस डेपोच्या बाजूस लिमज्या चव्हाण यांचे घराजवळ धाराशिव येथे फिर्यादी नामे-योगेश भारत रणदिवे, वय ३५ वर्षे, रा.साठेनगर ता. जि. धाराशिव यांना नमुद किरणने मोबाइल फोन न देण्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, विटाने मारहाण करुन जखमी केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-योगेश रणदिवे यांनी दि.०७.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे धाराशिव शहर येथे भा.न्या.सं.कलम ११८(१),११५(२),३५२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रभाकर रमेश कोळी, रा.सलगरा दि. ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची मोटरसायकल छत्रपती शिवाजी महाराज चौक तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# वक्फ मंडळाच्या जमिनीवरील अतिक्रमणे काढून नियमानुसार केलेल्या बांधकामांना सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात- राज्य वक्फ मंडळ अध्यक्ष




धाराशिव (जिमाका)- वक्फ मंडळाच्या शहरी भागातील जमिनीवर अतिक्रमणे करण्यात आली आहे.धाराशिव शहरातही हे दिसून येत आहे.वक्फ मंडळाच्या जमिनीवर जे अतिक्रमण केले आहे,त्यावर नियमानुसार कारवाई करून अतिक्रमण काढण्यात येतील आणि ज्या जमिनीवर नियमानुसार बांधकाम झाले आहे त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. असे निर्देश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी दिले.

वक्फ मंडळाच्या जमिनीवरील अतिक्रमण व महसुली अभिलेखातील नोंदीबाबत श्री.काझी यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बैठक घेतली,यावेळी ते बोलत होते.या बैठकीला जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, अपर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी संतोष राऊत, अरुणा गायकवाड उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,संजय पाटील,जिल्हा वक्फ अधिकारी सय्यद आमेर,सर्व तहसीलदार व सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी आदींची उपस्थिती होती.

श्री.काझी म्हणाले की,विविध विभागाशी संबंधित असलेल्या वक्फ मंडळाच्या अडचणी दूर व्हाव्यात हा या बैठकीचा उद्देश आहे.वक्फ मंडळाच्या जमिनीवर बांधकामाची परवानगी मागितली तर नियमानुसार परवानगी देण्यात येते.काही ठिकाणी शासकीय कार्यालये ही वक्फ मंडळाच्या जमिनीवर आहे. त्याबाबत शासनाशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. वक्फ मंडळाच्या जमिनीवर कोणी अतिक्रमण करत असतील, जबरदस्तीने त्या जमिनी ताब्यात घेत असतील तर योग्य ती कारवाई करण्यात येईल व संबंधिताविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येईल.असे श्री.काझी यांनी सांगितले.

वक्फ बोर्डाच्या जमिनीची नोंद सातबारावर घेण्यात येईल व बोर्डच्या अनुषंगाने महसूल विभाग सहकार्य करणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री.किर्ती किरण पुजार यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जिल्हा वक्फ अधिकारी श्री.आमेर यांनी नवीन वक्फ अधिनियम या अंतर्गत वक्फ मालमत्तांचे सर्वेक्षण,मालमत्तांचे फेरफार नोंदी घेणेबाबत,वक्फ मंडळाचे निर्देश व नवीन वक्फ मालमत्तांची नोंदणी,वक्फ मालमत्ता अवैध हस्तांतरणबाबत, व्यवस्थापनाचा ताबा हस्तांतरित करणे,वक्फ मालमत्ताच्या भूसंपादनाबाबत, महसूल विभागाच्या १३ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे, वक्फ जमिनीचे भूसंपादन,वक्फ जमिनीवरील अतिक्रमणाबाबत उम्मीद कायदा १९९५ च्या कलम ५४ अंतर्गत अतिक्रमण काढणे,वक्फ जमीन खालसा, वक्फ मालमत्ता नसल्याचे ना हरकत,वक्फ मालमत्तेवर बेकायदेशीर अतिक्रमण करणाऱ्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करणे आदी बाबतची माहिती सादरीकरणातून यावेळी दिली.या बैठकीत सादरीकरणातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

# ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्जदारांसाठी 'एकरकमी परतावा योजना' जाहीर

धाराशिव (जिमाका)- महाराष्ट्र राज्य इतर मागास वित्त व विकास महामंडळामार्फत इतर मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांसाठी विविध स्वयंरोजगाराच्या योजना राबविण्यात येतात.याच अनुषंगाने थकीत कर्ज प्रकरणांसाठी एक विशेष योजना जाहीर करण्यात आली आहे.

महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणांमध्ये संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत व्याजाच्या रकमेवर ५० टक्के सवलत देण्याबाबतची एकरकमी परतावा (OTS) योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

त्यामुळे थकबाकीदार लाभार्थ्यांनी या योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे,असे आवाहन ओबीसी महामंडळ,धाराशिवच्या जिल्हा व्यवस्थापक श्रीमती व्ही.डी.लहारे यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाशी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२३८६३ वर संपर्क साधावा.

# जिल्ह्यात कर्करोग तपासणी व जनजागृती अभियानास सुरुवात

धाराशिव, (जिमाका)- धाराशिव जिल्ह्यात कर्करोग तपासणी व जनजागृती अभियानास दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी सुरुवात झाली असून हे अभियान ३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे. प्रा.आ. केंद्र शिराढोण,ता.कळंब येथे कार्यक्रमाचे उद्धाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विनयशिल कुलकर्णी,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत बनसोडे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.जे.एन.सय्यद तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ३० वर्षांवरील नागरिकांची मौखिक कर्करोग,स्तन कर्करोग आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग तपासणी करण्यासाठी प्रत्येक परिमंडळास एक कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे.या मोहिमेचा उद्देश ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये कर्करोगाबाबत जनजागृती करणे तसेच आजाराचे निदान सुरुवातीच्या टप्प्यात करून योग्य उपचार उपलब्ध करून देणे हा आहे.

तपासणीसाठी व्हॅनमध्ये मौखिक कर्करोगासाठी वेलस्कोप व डेंटल चेअर,तर गर्भाशय मुखाच्या कर्करोगासाठी कोलपोस्कोपची सुविधा असून,स्त्रीरोग तज्ञ व दंत शल्यचिकित्सक यांच्या मार्फत निदान केले जाणार आहे.आशा स्वयंसेविकांना ३० वर्षांवरील नागरिकांना तपासणीसाठी संदर्भित करण्याचे निर्देश दिले आहेत.

संशयित रुग्णांचे बायोप्सी नमुने महालॅबमार्फत तपासले जाणार असून,निदान झालेल्या रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत संलग्न रुग्णालयांमध्ये उपचारासाठी पाठविण्यात येईल.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या कर्करोग तपासणी व जनजागृती अभियानाचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले आहे.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## जीएसटी कमी झाल्यास लाभ नागरिकांना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी जीएसटी कर प्रणालीत सुधारणा करण्यात येणार असे जाहिर केले होते त्यानुसार बरीच सुधारणा केली आहे. त्यामुळे महागाई कमी होणार आहे. काही जीवनावश्यक वस्तूचे दर कमी होणार आहे. जो जीएसटी लावला जात होता तो कमी झाल्याने दरही कमी होणार आहेत. जनतेत समाधान लाभणार आहे. सध्याला जीएसटीचे अनेक स्तर आहेत. काही बाबतीत अयोग्य जीएसटीची म्हणजे अधिक लावली जात होती. यावर बरीच टिका झाली. काही बाबी सरकारला लक्षात आल्याने त्या सुधारणा केली जात आहे. दररोजच्या जीवनात लागणाऱ्या वस्तूचे दर कमी होणार आहेत. ही मोठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट आहे. त्यानुसार तशी वाटचाल चालू आहे. अर्थमंत्र्यानी या बाबत तातडीने पाऊल उचलेले आहेत. त्यानुसार सुधारणा केली जात आहे. येत्या बावीस तारखेनंतर बराच फरक जानवणार आहे. भारताच्या करप्रणालीत २०१७ मध्ये वस्तू व सेवा कर लागू झाला. हा कर थेट उत्पादनापासून ते ग्राहकांपर्यंत सर्व टप्प्यांवर लागू होतो. यामुळे करप्रणाली सुलभ झाली असली तरी अनेक वस्तूंवर व सेवांवर लागू होणारा करदर काही प्रमाणात जास्त आहे. त्यामुळे व्यापारी वर्ग, उद्योगपती तसेच सर्वसामान्य ग्राहक या करामुळे त्रस्त होतात. जर जीएसटी दरांमध्ये कपात केली, तर त्याचे दीर्घकालीन व बहुआयामी फायदे होऊ शकतात. यामुळे अर्थव्यवस्थेत गतिशीलता येईल, उत्पादन वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि ग्राहकांच्या खिशावरचा ताण कमी होईल. जीएसटी दर घटवल्यास वस्तू व सेवा स्वस्त होतील. उदाहरणार्थ, जर इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंवरील कर २८% वरून १८% केला, तर मोबाईल, टीव्ही, संगणक यांची किंमत कमी होईल. वस्तू स्वस्त झाल्यास सामान्य नागरिक अधिक खरेदी करू शकतात. यामुळे जीवनमान उंचावते. कर जास्त असला की बेकायदेशीर व्यवहार वाढतात. कर कमी झाल्यास लोक अधिकृत पावती घेऊन खरेदी करतात. हाही परिणाम होतो. करदर घटल्यामुळे वस्तू स्वस्त होतात व विक्री वाढते. विक्री वाढल्यामुळे उद्योगाचा नफा वाढतो. स्वस्त उत्पादनांमुळे भारतीय उद्योग परदेशी कंपन्यांशी चांगली स्पर्धा करू शकतात. उद्योगांना कर म्हणून कमी रक्कम द्यावी लागते, त्यामुळे त्यांचा रोख प्रवाह चांगला राहतो. लघु व मध्यम उद्योगांवर कराचा बोजा कमी होऊन त्यांचा विस्तार सुलभ होतो. वस्तू व सेवांची मागणी वाढल्यामुळे उत्पादन क्षेत्रात नवीन रोजगार निर्माण होतात. सेवा क्षेत्रात (हॉटेल, पर्यटन, मनोरंजन, माहिती तंत्रज्ञान) रोजगार वाढू शकतो.लघुउद्योग व स्टार्टअप्स वाढल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळते. काही लोकांच्या मते करदर कमी केल्यास सरकारचा महसूल कमी होईल. परंतु वस्तुस्थिती अशी की जास्त करदर = कमी विक्री, जास्त चोरी. कमी करदर = जास्त विक्री, करपालन वाढते. ही बाब नजरेआड करता येत नाही. म्हणून करदर कमी केल्याने महसूलात घट न होता उलट वाढ होऊ शकते. उदाहरणार्थ, मोबाईल हँडसेटवरील करदर कमी केल्यावर विक्री झपाट्याने वाढली आणि सरकारला जास्त महसूल मिळाला. कर कमी झाल्यामुळे वस्तू व सेवांच्या किमती कमी होतील आणि किमती कमी झाल्याने महागाईवर नियंत्रण मिळेल. परदेशी कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास तयार होतील कारण करदर कमी असल्यास उत्पादन खर्च कमी होतो. सर्वात महत्वाचे म्हणजे हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, प्रवास या क्षेत्रांवर जीएसटी जास्त असल्याने पर्यटक खर्च कमी करतात. करदर कमी झाल्यास पर्यटनाला चालना मिळेल. शिक्षण व आरोग्याशी संबंधित वस्तूंवर करदर कमी झाल्यास समाजातील सर्व घटकांना परवडणाऱ्या सेवांचा लाभ मिळतो. सर्वात महत्वाची बाब समोर ती म्हणजे शेतीसंबंधी उपकरणे, खते, बियाणे यावरील जीएसटी कमी झाल्यास शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल व ग्रामीण भागात उत्पादन, खरेदी-विक्री वाढेल. करदर कमी झाल्यामुळे सामाजिक विषमता कमी होईल. गरीब व मध्यमवर्गीयांना दिलासा मिळेल. ग्राहकांच्या समाधानातून सामाजिक स्थैर्य निर्माण होईल. स्वस्त भारतीय उत्पादने परदेशी बाजारात स्पर्धात्मक ठरतील. जीएसटी दरांमध्ये कपात करणे म्हणजे सरकारच्या महसुलाला तोटा होईल असे नाही. उलटपक्षी, यामुळे ग्राहक समाधानी होतील, उद्योगक्षेत्र फुलेल, रोजगारनिर्मिती होईल, महागाई कमी होईल, आणि अखेर सरकारलाच जास्त महसूल मिळेल. म्हणून दीर्घकालीन विकासासाठी जीएसटी दर कमी करणे ही काळाची गरज आहे. भारतासारख्या मोठ्या व विविधतेने परिपूर्ण देशात ग्राहकांचा विश्वास व उद्योगांचे आरोग्य टिकवायचे असेल, तर करप्रणाली ग्राहकाभिमुख व उद्योगस्नेही करणे आवश्यक आहे. बावीस तारखेनंतर बऱ्याच बाबी लक्षात येतील. प्रत्यक्षात याचा लाभ मिळेल त्याच वेळी परिणाम दिसून येणार आहे. सिंमेंटचे दर कमी होणार आहेत त्यामुळे बांधकामे वाढतील, बांधकाम कामगारांच्या हाताला काम मिळेल. महागाई वाढल्याने अनेक बाबी ठप्प आहेत. अनेकांच्या हाताला काम नाही. काही बाबतीत जीएसटी अधिक होती. त्यामुळे टॅक्समध्ये बचत व्हावी व स्वस्तात माल मिळावा म्हणून अनेक वेळा पावती घेतली जात नव्हती. यामुळे सरकारचा तोटा होत होत. आता जीएसटी कमी झाल्यास ग्राहकच पावती मागतील त्यामुळे महसुलात वाढ दिसून येणार आहे. कर भरण्यात भारतीय मागे नाहीत. कर भरण्याची मानसिकता आहे मात्र यात सुधारणा अपेक्षित आहे. काही झाले तरी कर प्रणालित सुटसुटतीता आणली कर मोठ्या प्रमाणात महसुल वाढ होवू शकते. बरेच जन कराची झंझट नको. कशाला मागे लावुन घ्यावी ही मानसिकता असते. याचा देखिल विचार झाला पाहिजे. जनता कर स्वत: होवून भरली पाहिजे. अशी सुलभता कर प्रणालित असली पाहिजे. सरकारने काही झाले तरी जीएसटी कमी करण्याचा जो निर्णय घेतला तो सरकार व करदात्यासाठी योग्य ठरणारा आहे. याचे परिणाम बावीस तारखेनंतर दिसून येणार आहेत.

# निलंगा येथे ईद -ए- मिलाद निमित्ताने रक्तदान शिबिर संपन्न



**निलंगा/प्रतिनिधी :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी निलंगा शहरात ईद -ए- मिलाद (पैगंबर जयंती) निमित्ताने ईद-ए-मिलादूनबी कमेटी निलंगा च्या वतीने शहरातील औरंगपुरा येथील जुने मार्केट यार्ड येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पीरपाशा दर्गा चे सज्जदे सय्यद युसुफ जानी कादरी यांच्या हस्ते करण्यात आले.

रक्तदान सर्वश्रेष्ठ दान ब्रिद वाक्य प्रमाणे काम करून दाखवले आहे. मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त अर्थात ईद-ए-मिलादूनबी या सणानिमित्त दि. ८ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरात १३० जणांनी रक्तदान करुन सामाजिक बांधिलकी जपत एक चांगला संदेश देण्यात आला आहे. या रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी खालील तिलगुरे, असगर अन्सारी, नसीम खातिब, इम्रान सय्यद, सबदर कादरी, बाबा बिबराले, खारी गुलाम गौस,खारी हबीब, समद सत्तारी, वसीम अत्तार, मोहम्मद शेख यांच्यासह ईद-ए-मिलादूनबी कमेटी निलंगा चे सदस्य पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

केळगाव येथे ५० जणांचे रक्तदान

निलंगा तालुक्यातील केळगाव येथील खिदमत - ए - इन्सानियत फाउंडेशन व युथ मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने ईद-ए मिलादुन्नीबी निमित्त ए.पी. जे. अब्दुल कलाम चौकात रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरात ५० जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन मुश्ताक पटेल यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी प्रेषित मुहम्मद सागर आले या यांनी विचारावर प्रकाश टाकला. शिबिराच्या यशस्वितेसाठी खिदमत-ए-इन्सानियत फाउंडेशनचे शफीक शेख, सहील मुळे, मन्सूर शेख, शाहरुख मुजावर, मोहसीन पांढरे, इनुस पांढरे, इम्रान पटेल, मदार माकणे, आसिफ पटेल, अझर शेख, आशिफ शेख, असद आसिफ मुजावर, जोहर पांढरे, इस्माईल अरबाज पटेल, मलंग शेख सह इतर समाजातील परिश्रम घेतले.

हलगरा येथे ६५ जणांचे रक्तदान

तालुक्यातील हलगरा येथील जामा मज्जिदमध्ये ईद ए मिलादनिमित्त ६५ मुस्लिम बांधवांनी रक्तदान करुन समाजपयोगी उपक्रम राबविला.जामा मज्जिदचे प्रमुख तथा हलगरा येथील माजी सरपंच समियोद्दीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली येथील मुस्लिम समाजातील युवकांनी ईद ए मिलादनिमित्त शनिवारी रक्तदान शिबीर घेतले. जामा मज्जिद येथे आयोजित शिबिरात ६५ जणांनी रक्तदान केले. माऊली ब्लड बँकेतर्फे रक्तसंकलन करण्यात आले.रक्तदात्याला प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी सर्व मुस्लिम समाजातील युवकांनी सहभाग घेत

सामाजिक उपक्रम राबविला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# युवक महोत्सवाचे थाटात उद्घाटन; ४५ महाविद्यालयातील कलावंतांचा सहभाग



**धाराशिव/प्रतिनिधी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव जिल्ह्यातील युवक महोत्सवाला सोमवारी थाटात सुरुवात झाली. जिल्हयातील ४५ महाविद्यालयातील कलावंत सहभागी झाले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व जवाहर महाविद्यालय अणदुर आयोजित धाराशिव जिल्हा युवा महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ अणदुर चे सचिव रामचंद्र दादा आलुरे होती. प्रमुख अतिथी म्हणून सिने अभिनेता, टी.व्ही.स्टार उमेश जगताप, सदस्य ॲड.लक्ष्मीकांत पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम, विद्यार्थी विकास मंडळ संचालक, डॉ.कैलास अंभुरे, जिल्हा समन्वयक प्राचार्य डॉ.संदीप देशमुख, डॉ.सतीश गावित यांची प्रमुख उपस्थिती होती. शोभायात्रेने युवा महोत्सवाची सुरुवात झाली. ग्रामदैवत खंडोबाच्या मंदिरापासून जवाहर महाविद्यालय पर्यंत विविध महाविद्यालयातील संघांनी या शोभायात्रेत सहभाग नोंदविला. उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. विजय फुलारी म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांशी आलूरे गुरुजींचा ऋणानुबंध होता. गुरुजींचे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामीण भागामध्ये युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पाठीवरती थाप द्या. त्यांना विश्वासात घेऊन संस्कार करा. असे आव्हान केले. सिने अभिनेता उमेश जगताप म्हणाले की, तुळजापूरच्या मातीने मला भरपूर दिले आहे. या मातीत मी जन्मलो, घडलो तुम्ही ही घडा. युवा महोत्सव आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे जीवनाला कलाटणी मिळते. बक्षीस का मिळाले? का मिळाले नाही? याचाही विचार करा. आज तरुणाई मोबाईलच्या विळख्यात सापडलेली आहे. यातून बाहेर पडा, परिस्थिती जशी आहे तशी स्वीकारा, पुढे जा. तर अध्यक्ष समारोप करताना रामचंद्र दादा आलुरे म्हणाले की, जीवनात कलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चेहरा कोणी पाहत नाही, कला पाहत असतात. कोणत्याही मानपत्राची अपेक्षा न करता कर्म केल्यास यश निश्चित प्राप्त होतो. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. तर विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, डॉ.कैलास अंभुरे यांनी युवा महोत्सव आयोजनाची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संतोष पवार व भैरवनाथ कानडे यांनी केले. आभार डॉ.मल्लिनाथ बिराजदार यांनी मानले. या उद्घाटन समारंभासाठी धाराशिव जिल्ह्यातील ४५ महाविद्यालयाचे संघप्रमुख, कलाकार तसेच धाराशिव जिल्ह्यातील महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, आणदूर पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महोत्सवाचा समारोप**

धाराशिव जिल्हा युवक महोत्सवाच्या समारोप व पारितोषिक वितरण समारंभ मंगळवारी (दि.नऊ) दुपारी चार वाचता होणार आहे. समारोपप्रसंगी अभिनेता योगेश शिरसाठ, रुपलक्ष्मी चौगुले-शिंदे यांची प्रमुख उपस्थिती समारोप प्रसंगी राहणार आहे.

**पाच रंगमंचावर सादरीकरण**

युवक महोत्सवासाठी मुख्य मैदानावर सृजनरंग हा मंचावर असणार आहे. याच ठिकाणी भारतीय शास्त्रीय तालवाद्य, लोकवाद्य वृंद, पाश्चात्य सुगम गायन, भारतीय शास्त्रीय नृत्य, लोक आदीवासी नृत्य, सुगम गायन, समूह गायन हे कलाप्रकार होतील. नाटयरंग या दुसऱ्या रंगमंचावर मुकाभिनय, एकांकिका, शास्त्रीय गायन, नाटयसंगीन, प्रहसन, नकला हे कलाप्रकार होतील. तर शब्दरंग या सि.ना.आलुरे गुरुजी सभागृहात वादविवाद व वक्तुत्व स्पर्धा घेण्यात आली. तर ललितरंग मंचावर रांगोळी तर शब्दरंग या रंगमंचावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली

जवाहर महाविद्यालयात महोत्सव रंग

धाराशिव जिल्हा - जवाहर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अणदूर ता.तुळजापूर - दि.८ व ९ सप्टेंबर दरम्यान होणार आहे. जिल्हयातील ९२ महाविद्यालयांचे संघ यात सहभागी होणार आहेत.

**सहा गटात कला प्रकार**

यंदाच्या युवक महोत्सवात एकूण पाच गटात २८ कलाप्रकार सादर होणार आहेत. तसेच शोभायात्रा हा स्वंतत्र कलाप्रकारही असणार आहे. कला **विभाग व कलाप्रकार पुढील प्रमाणे :-**

१) **संगीत विभाग** (दहा प्रकार) - भारतीय शास्त्रीय गायन, भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत, भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य), नाटयसंगीत, भारतीय सुगम संगीत (भा), भारतीय समूहगान (भा), भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद, पाश्चिमात्य गायन, पाश्चिमात्य वाद्य संगीत, पाश्चिमात्य समूहगाय.

२) **नृत्य विभाग** - भारती शास्त्रय नृत्य, भारतीय लोकसमुह

३) **नाटय विभाग** - एकांकिका, प्रहसन, नक्कल, मूकअभिनय

४) **वाङ्‌मय विभाग** - वादविवाद, प्रश्नमंजूषा, वत्तृत्व

५) **ललित कला विभाग** - स्थळचित्र, चिकटकला, पोस्टर मेकिंग, मातीकला, व्यंगचित्रे, रांगोळी, स्थळ छायाचित्रण, इंस्टालेशन, लघुचित्रपट.

लोककला महोत्सव जानेवारीत

गेल्या युवक महोत्सवात मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी घोषित केल्याप्रमाणे येत्या जानेवारीत स्वतंत्र लोककला महोत्सव घेण्यात येईल. या महोत्सवात पोवाडा (सांघिक), भारुड (सांघिक), वासुदेव (वैयक्तिक) गोधळ (सांघिक), भजन (सांघिक), लोकगीत (सांघिक), लोकनाटय (सांघिक), जलसा (सांघिक), कव्वाली (सांघिक), लावणी (वैयक्तिक/ सांघिक), कवितावाचन (वैयक्तिक), शोभायात्रा (सांघिक) आदी १२ कलाप्रकार सादर होणार आहेत, आगी माहिती संचालक डॉ.कैलास अंभुरे यांनी दिली.

# सह्याद्रीच्या हृदयातील अभेद्य गड : प्रतापगड

सह्याद्रीच्या उंचसखल डोंगररांगांमध्ये, दाट जंगलांच्या कुशीत आणि नागमोडी घाटांच्या वळणावर अभिमानाने उभा असलेला प्रतापगड हा मराठा इतिहासातील एक सोनेरी पान आहे.या गडाचे सामरिक महत्त्व केवळ त्याच्या उंचसखल भौगोलिक रचनेत नाही,तर आजूबाजूच्या दऱ्या, खोऱ्या आणि घाटांवर ठेवलेल्या नियंत्रणातही दडलेले आहे. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध डोंगरी किल्ला म्हणून या किल्ल्याची ओळख आहे.सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात महाबळेश्वरच्या नैर्ऋत्येस १३ कि.मी.वर हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची १,०९२ मी.आहे.पूर्वेकडील बाजूस ३४० मी.आणि पश्चिमेकडे ८७० मी. खोल दरी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकल्यानंतर मोरो त्रिंबक पिंगळे यांना १६५६ मध्ये हा किल्ला बांधून घेण्याची आज्ञा दिली.

प्रतापगड हा बालेकिल्ला आणि त्याच्या सभोवतालचा खालचा भाग, अशा दोन प्रमुख भागात विभागलेला आहे.डोंगराच्या शिखरावर असलेल्या बालेकिल्ल्यात राजवाडा,सदर, केदारेश्वर मंदिरे,पाण्याच्या टाक्या आणि धान्य-रसद साठवणीसाठीच्या कोठाऱ्या यांसारखी महत्त्वाची बांधकामे होती.तर दक्षिण व पूर्व उतारावर बांधलेल्या खालच्या भागात पहिली तटबंदी आणि प्रचंड बुरुज शत्रूला दरीतच अडकवून ठेवण्यासाठी होती.

मुख्य किल्ला,माची आणि बालेकिल्ला असे या किल्ल्याचे तीन भाग होतात.मुख्य किल्ला व बालेकिल्ला भागांत तलाव असून संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्याच्या चोहोबाजूंस भक्कम तटबंदी व बुरूज आहेत. बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ ३,६६० चौ. मी.,तर मुख्य किल्ल्याचे ३,८८५ चौ. मी असून दक्षिणेकडील बुरूज १० ते १५ मी.उंचीचे आहेत. त्यांपैकी रेडका, राजपहारा,केदार इ.



बुरुजांचे अवशेष टिकून आहेत. बुरूज वैशिष्ट्यपूर्ण असून निमुळत्या डोंगर धारेच्या शेवटी आहे.या भागाला माची म्हणतात.कारण अशाच स्वरूपाचे बांधकाम राजगड (सुवेळा व संजीवनी),तोरणा ( झुंजार) या किल्ल्यांवरील माच्यांना आहे. किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी तब्बल ४० फूट उंच असून तिच्या भक्कम रचनेमुळे प्रतापगड अभेद्य बनला होता.संपूर्ण बांधकाम काळ्या पाषाणात केले गेले आहे. गडाच्या उंच बुरुजांवरून जावळीच्या खोऱ्यातील डोंगर-दऱ्यांवर सतत नजर ठेवता येत असे,त्यामुळे शत्रूच्या हालचाली वेळेत ओळखणे सोपे होत असे.

मुख्य किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे पार करून जावे लागते. दोन्ही दरवाजांवर शरभाच्या प्रतिमा दिसतात.दोन दरवाजे पार केल्यावर तुळजा भवानीचे मंदिर आहे.या देवालयासमोर दोन उंच दीपमाळा आहेत.त्या जवळच नगारखान्याची इमारत आहे.भवानी देवीचे मूळ मंदिर दगडी गाभाऱ्याचे होते.१८२० मध्ये सातारच्या प्रतापसिंह महाराजांनी तेथे लाकडी मंडप बांधला.

अरुंद,नागमोडी चढणाऱ्या वाटा आणि दारांच्या पुढे लपवलेले मजबूत अडथळे यामुळे कुणालाही सरळपणे गडावर प्रवेश करणे शक्य नव्हते. महादरवाजा तर संरक्षणकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो.गोमुखी शैलीत बांधलेला हा दरवाजा रचनेत इतका कुशल होता की,अरुंद मार्गाने आत येणाऱ्या शत्रूंना दोन्ही बाजूंच्या बुरुजांतून सहज हल्ल्याच्या टप्प्यात आणले जाई.

प्रतापगडाचे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुसंरचित जलव्यवस्था. किल्ल्यावर चार प्रमुख पाण्याच्या टाक्या आहेत.यापैकी दोन बालेकिल्ल्यात तर दोन खालच्या भागात आहेत. पावसाचे पाणी साठवण्यासाठी नैसर्गिक उतारांचा कुशलतेने वापर करण्यात आला होता.त्यामुळे गडावरील लोकसंख्येला वर्षभर पुरेल इतका पाणीपुरवठा व्हायचा.ही योजना मराठ्यांच्या अभियांत्रिकी व व्यूहनीती कौशल्याचा अद्वितीय नमुना ठरते.

प्रतापगडचे ऐतिहासिक महत्त्व अफझलखान छत्रपती शिवाजी महाराज भेट व त्याप्रसंगी झालेला अफझलखानाचा वध या घटनेमुळे वाढले (१६५९). छत्रपती राजाराम महाराज सुद्धा जिंजीस जात असताना प्रथम प्रतापगडास आले. स्वातंत्र्योत्तर काळात या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. त्याचे अनावरण १९५७ च्या नोव्हेंबर महिन्यात तत्कालीन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांनी केले.

आजही हजारो लोक केवळ त्या क्षणाशी नाते जोडण्यासाठी प्रतापगडावर भेट देतात.गडावर दरवर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.अफझलखान भेटीचे नाट्यरूप सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी निगडित उपक्रम यामुळे प्रतापगड महाराष्ट्राच्या अस्मिता आणि सांस्कृतिक एकतेचे केंद्र ठरतो. प्रतापगड मराठ्यांच्या धैर्य,रणनीती आणि स्वराज्याच्या स्वप्नाचा जिवंत साक्षीदार आहे.सह्याद्रीच्या कुशीत उभा असलेला हा गड आजही भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा एक अढळ दुवा आहे.

युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा मानंकन दिले असून त्यात प्रतापगडाला विशेष स्थान मिळाले आहे. त्यामुळे प्रतापगड आज केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता जगाच्या सांस्कृतिक वारशाचा एक अनमोल ठेवा म्हणून गौरवला जातो.

**-संजय डी.ओरके**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई.**

# परंड्यात फुले, गुलाल, भंडाऱ्याची उधळण करत बाप्पांना निरोप: मिरवणूक मोठ्या उत्साहात व शांततेत

**परंडा/प्रतिनिधी :** तालुका व शहर परिसरात अनंत चतुर्थीच्या दिवशी विविध गणेश मंडळानी गणपती बप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या जयघोष करीत फुलांची व गुलाल भंडाराची उधळन करीत लेझीम पथक, ढोल-ताशा व बँडच्या वाद्यात श्रींची विसर्जन मिरवणूक काढून शनिवारी (दि. ६) सायंकाळी मोठ्या उत्साहात बाप्पाला निरोप दिला. शहरातील परवानाधारक गणेश मंडळांची संख्या १५ असून, मंडळाने श्रींची प्रतिष्ठापना करून सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. तसेच समर्थ गणेश मंडळ, जय मल्हार गणेश मंडळ, गारभवानी गणेश मंडळ, नरवीर गणेश मंडळ, शिवाजीनगर गणेश मंडळ, विठ्ठल गणेश मंडळ व टेंबे गणेश मंडळ, बालवीर गणेश मंडळ, राजे शिवछत्रपती गणेश मंडळ, मोरया गणेश मंडळ, नृसिंह गणेश मंडळ, निळा झेंडा गणेश मंडळ, गार भवानी गणेश आदी मंडळाने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवले तसेच भाविक भक्तासाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक गणेश मंडळाचे दरवर्षी मूर्ती खरेदीचा खर्च टळला व जल प्रदूषण टाळून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न केला. तालुक्यातील परंडा हद्दीत ६० गणेश मंडळाने प्रतिष्ठापना केली. शहरात १८ ठिकाणी मंडळाच्या वतीने प्रतिष्ठापना केली होती. पोलिस निरीक्षक आसाराम चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता. शहराजवळील विसर्जन तलावाच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त होता.

**झांज, हलगीचा निनाद...**

श्रींच्या मूर्तीचे विसर्जन लेझीम पथक, बँड पथक, हलगी पथक, झांज पथक आदींच्या वाद्यात मोठ्या उत्साहात विसर्जन मिरवणूक काढली. शुक्रवारी विठ्ठल गणेश मंडळ व हंसराज गणेश मंडळाच्या वतीने श्री ची विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात व शांततेत काढण्यात आली.

## रिकाम्या पोटी ओव्याचे पाणी पिण्याचे आरोग्यदायी फायदे

ओवा हा भारतीय स्वयंपाकघरात वापरला जाणारा एक सामान्य मसाला आहे, पण त्याचे आरोग्यदायी फायदे खूप मोठे आहेत. विशेषतः, रोज सकाळी रिकाम्या पोटी ओव्याचे पाणी प्यायल्यास अनेक आरोग्यविषयक समस्यांपासून आराम मिळतो. रिकाम्या पोटी ओव्याचे पाणी पिण्याचे फायदे खालीलप्रमाणे आहेत:

१. पचनक्रिया सुधारते ओव्याच्या पाण्यात 'थायमोल' नावाचा घटक असतो, जो पचनक्रिया सुधारण्यासाठी खूप फायदेशीर आहे. थायमोल गॅस्ट्रिक ज्यूस उत्तेजित करतो, ज्यामुळे अन्न पचण्यास मदत होते. हे पाणी नियमित प्यायल्यास पोटातील गॅस, ब्लोटिंग आणि जडपणा यांसारख्या समस्यांवर त्वरित आराम मिळतो.

२. पोटदुखी आणि मुरड कमी करते ओव्याच्या पाण्यातील घटक पोटाच्या स्नायूंना आराम देतात. यामुळे पोटात येणारी मुरड किंवा दुखणे कमी होते आणि गॅसमुळे होणाऱ्या त्रासापासूनही सुटका मिळते.

३. हानिकारक बॅक्टेरियापासून संरक्षण ओव्यामध्ये अँटीमायक्रोबियल गुणधर्म असतात, जे हानिकारक बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करतात. यामुळे डायरिया आणि खराब पचनामुळे होणाऱ्या इतर समस्या कमी होतात.

४. जळजळ शांत करते मसालेदार किंवा जड जेवण खाल्ल्यानंतर अनेकदा छातीत किंवा पोटात जळजळ होते. ओव्याचे पाणी ही जळजळ शांत करण्यास मदत करते.

तयारी कशी कराल? रात्री एक चमचा ओवा एका ग्लास पाण्यात भिजत ठेवा. सकाळी हे पाणी गाळून रिकाम्या पोटी प्या. तुम्ही हे पाणी थोडे कोमट करूनही पिऊ शकता.

थोडक्यात, ओव्याचे पाणी पोटाच्या छोट्या-मोठ्या समस्यांवर एक नैसर्गिक, स्वस्त आणि सुरक्षित उपाय आहे.



## मृत्यूचे भय नाही

एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल. दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते.

चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.

## येत्या पाच वर्षांमध्ये भारत बनेल ईव्ही हब

न्यूयॉर्क येथील 'रोडियम ग्रुप' नावाच्या संशोधन फर्मच्या अहवालात २०३० पर्यंत भारताची इलेक्ट्रिक कार उत्पादन क्षमता दर वर्षी २५ लाख युनिट्स (२.५ दशलक्ष) होऊ शकते, असे म्हटले आहे. ही वाढ सध्याच्या क्षमतेपेक्षा (दोन लाख युनिट्स) दहापट जास्त असेल. असे झाल्यास चीन, युरोप आणि अमेरिकेनंतर भारत जगातील चौथा सर्वांत मोठा ईव्ही उत्पादक देश बनू शकतो; परंतु अहवालात असेही म्हटले आहे की भारताला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकून रहायचे असेल, तर उत्पादन खर्च कमी करावा लागेल; जेणेकरून चीनसारख्या मोठ्या शक्तींशी स्पर्धा करू शकेल.

'रोडियम'च्या अहवालानुसार २०३० पर्यंत भारतात इलेक्ट्रिक कारची मागणी चार लाख ते १४ लाखांच्या दरम्यान असेल; परंतु उत्पादनक्षमता २५ लाखांपर्यंत पोहोचू शकते. म्हणजेच भारतात आवश्यक असलेल्या वाहनांच्या संख्येपेक्षा जास्त वाहने बनवली जातील. याचा अर्थ असा की येथे उत्पादित ईव्ही वाहने देशाबाहेर निर्यात करण्यासाठी मोठ्या संख्येने तयार असतील; पण कंपन्या त्यांच्या खर्चात कपात करतील, तेव्हाच हे शक्य होईल. त्यामुळे त्या चीनसारख्या मोठ्या स्पर्धकाशी स्पर्धा करू शकतील आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकून राहतील.

भारत टॉप-फोरमध्ये २०३० पर्यंत, भारतातील इलेक्ट्रिक वाहनांची उत्पादन क्षमता २५ लाखांपर्यंत पोहोचू शकते. त्यामुळे तो जगातील चौथा सर्वांत मोठा ईव्ही उत्पादक बनेल. भारत या काळात जपान आणि दक्षिण कोरियालाही मागे टाकेल. सध्या जपानकडे सुमारे ११ लाख युनिट्सची तर दक्षिण कोरियाकडे सुमारे ५ लाख युनिट्सची उत्पादनक्षमता आहे; परंतु दोन्ही देशांमध्ये भविष्यातील योजना हळूहळू बनवल्या जात आहेत. दुसरीकडे, भारतात परिस्थिती खूप वेगाने



बदलत आहे.

भारतातील ईव्हीची विक्री मंदावली

ईव्ही खरेदी करण्याच्या बाबतीत भारत थोडा मागे आहे. व्हिएतनाममध्ये २०२२ मध्ये फक्त तीन टक्के लोकांनी ईव्ही खरेदी केली होती. २०२४ पर्यंत हा आकडा १७ टक्क्यांपर्यंत पोहोचला, तर भारतात २०२४ पर्यंत इलेक्ट्रिक कारची विक्री फक्त दोन टक्के राहिली. ती खूपच कमी आहे. याचा अर्थ असा की भारतातील ईव्ही बाजारपेठ मोठी आहे; परंतु ती यशस्वी करण्यासाठी काही महत्त्वाच्या बाबींकडे खास लक्ष द्यावे लागेल. सर्वप्रथम सरकारची धोरणे स्पष्ट आणि सुसंगत असली पाहिजेत. त्यामुळे लोक त्यावर विश्वास ठेवू शकतील. तसेच, वाहनांच्या किमती आणि उत्पादन खर्च कमी असावा. त्यामुळे लोक ती सहज खरेदी करू शकतील. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ईव्ही खरेदी करणार्या लोकांचा वापराचा अनुभव चांगला असावा; म्हणजे ड्रायव्हिंगपासून चार्जिंगपर्यंत सर्व काही सोपे आणि आरामदायी असले पाहिजे, तरच भारताचा ईव्ही उद्योग खरोखर पुढे जाऊ शकेल.

## उच्च शिक्षणाची घसरण

आकर्षक घोषणा करताना शैक्षणिक स्वातंत्र्य हिरावले जात आहे. 'प्राचीन भारतीय विद्या' यासारख्या विषयांवर 'परिवारा'च्या मार्फत खर्च वाढवला जात आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन मांडणे गुन्हा ठरत आहे. शिक्षणाला भगवा रंग देऊन विद्यापीठांचा दर्जा सुधारणार नाही.

भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची स्थिती किंवा 'दशा' दु:खद असल्याचे समोर आले आहे. शिक्षणाचे माहेरघर असा 'एके काळी' लौकिक असलेल्या पुण्यातील शैक्षणिक संस्थांची अवस्था जास्त वाईट आहे. केंद्र सरकारच्या शिक्षण खात्याने केलेल्या एका पाहणीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा क्रमांक ९१ वा आला आहे. गेल्या पाहणीत तो ३७ वा होता. विद्यापीठाच्या गटात २३ वरून ५६ वा अशी या विद्यापीठाची घसरगुंडी झाली आहे. या विद्यापीठाचा दर्जा तीव्रपणे खालावला आहे हे त्यावरून दिसते. 'सीईओपी' या पुण्यातील प्रसिद्ध अभियांत्रिकी महाविद्यालयाचे रूपांतर आता तंत्रविज्ञान विद्यापीठात झाले आहे. त्याचा क्रमांक अभियांत्रिकी संस्थांमध्ये ९० वा आहे. विज्ञान शिक्षण व संशोधन या क्षेत्रातील 'आयसर' या पुण्यातील नाणावलेल्या संस्थेचा क्रमांक ४२ वरून ५६ झाला आहे. मुंबई विद्यापीठाचा क्रमांक १०० ते १५० या टप्प्यातून बाहेर पडून ९२ वा झाला आहे. याला 'मानांकन' तरी कसे म्हणावे? पहिल्या दहा संस्थांमध्ये सहा 'आयआयटी' आहेत. संघ परिवाराला न आवडणारे 'जवाहरलाल नेहरू विद्यापीठ जेएनयू' पहिल्या दहांत आपले स्थान टिकवून आहे. उच्च शिक्षणाविषयी केंद्र सरकार गंभीर आहे की नाही असे या मानांकनांवरून वाटते.

शैक्षणिक संस्थांची ही पाहणी व मानांकन 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क' या नावाने ओळखले जाते. त्यात शैक्षणिक संस्थांमध्येही विषय व विद्याशाखांनुसार उपगट असतात. आय आय टी व आय आय एस (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) या संस्था जरी उत्तम असल्या तरी उच्च शिक्षण घेऊ इच्छिणारे सर्व विद्यार्थी या संस्थांमध्ये प्रवेश घेऊ शकत नाहीत किंवा त्यांना त्या विषयांमध्ये



रस नसतो. अन्य विद्याशाखांसाठी त्यांना विद्यापीठांवर अवलंबून राहावे लागते; त्यामुळे सर्वसाधारण विद्यापीठांचा दर्जा उत्तम असणे अत्यावश्यक आहे. तेथे पारंपरिक विद्यापीठे कमी पडल्याचे दिसते. स्वतंत्र संशोधनाची स्थिती अधिक दारुण आहे. महाराष्ट्रातील सरकारी विद्यापीठांची कामगिरी सुमार झालेली असताना खासगी शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांनी चांगली कामगिरी करून क्रमांक सुधारल्याचे मानांकनाच्या यादीवरून लक्षात येते. पुण्यातीलच नव्हे तर देशातील खासगी शैक्षणिक संस्थांचे शुल्क 'जास्त' ते 'प्रचंड' असते. मर्यादित उत्पन्न असणार्या गटातील मुले-मुली तेथे प्रवेश घेऊ शकत नाहीत त्यांना सरकारी विद्यापीठांवर अवलंबून राहावे लागते.

या विद्यापीठांना अध्यापक व शिक्षकेतर कर्मचार्यांचे वेतन, शैक्षणिक साहित्य आदी बाबींसाठी अनुदान मिळते. खेरीज ते शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क आदी शुल्केही घेतातच. मग ही विद्यापीठे मागे का पडली असा प्रश्न उपस्थित होतो. सावित्रीबाई फुले विद्यापीठातील अनेक अध्यापक व प्राध्यापक गेल्या एक - दोन वर्षांत निवृत्त झाले, त्याचा परिणाम अध्यापन व संशोधनावर झाल्याचे विद्यापीठाच्या कुलगुरूंनीच मान्य केले आहे. इतर विद्यापीठांची अवस्था तशीच आहे. मग त्यांच्या जागी नव्या अध्यापकांची नियुक्ती का करण्यात आली नाही? हा प्रश्न येतो. गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारचा शिक्षणावरील खर्च कमी होत आहे हे त्यामागचे एक कारण आहे. २०२४-२५ या वर्षात 'विद्यापीठ अनुदान मंडळा'साठीची तरतूद ६ हजार ८०९ कोटी रुपयांवरून २९०० कोटी करण्यात आली.

भारतीय तंत्रज्ञान शिक्षण समितीची ही (एआयसीटीई) तरतूद घटली आहे. चालू (२०२५-२६) वर्षासाठी शालेय व उच्च शिक्षणासाठी मिळून १ लाख २८ हजार कोटी रुपयांची तरतूद आहे; पण त्यात वेतन व भत्ते, शालेय पोषण योजना यांचाही समावेश आहे. 'जीडीपी'च्या जेमतेम २.७ टक्के ही तरतूद आहे. जागतिक मानक ४ ते ६ टक्के आहे. आयआयटी व आयआयएम यांच्यावरील खर्चही कमी होत आहे. शिक्षणाच्या मूलभूत सुविधाच मिळत नसतील, तर मग अध्यापन, शिक्षण, संशोधन चांगले कसे होणार? अशा स्थितीत उच्च शिक्षणाची घसरगुंडी होणे अपरिहार्य आहे.

### डॉक्टरांपासून दूर राहण्यासाठी — डॉक्टर टीप्स





दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.तुम्हाला आरोग्य चांगलं ठेवायचं असेल आणि डॉक्टरपासून दूर राहायचं असेल, तर शरीराकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

**कॅल्शियम, लोह गरजेचं**–शरीराला तंदुरुस्त ठेवण्यासाठी काही बाबी लक्षात घेणं गरजेचं आहे. कॅल्शियम आणि लोहाची शरीराला आवश्यकता असते. कॅल्शियम आणि लोहाच्या कमतरतेमुळे तुम्हाला चालता-फिरताना त्रास होऊ शकतो; म्हणूनच डॉक्टरही तुम्हाला या दोन्हींचं संतुलन राखण्याचा सल्ला देतात. आहारात कॅल्शियम आणि लोह यांचं प्रमाण भरपूर असेल, अशा पदार्थांचा समावेश करावा. यात मेथी, पालक, हिरव्या पालेभाज्या यांचा समावेश आहे.

### विनोद




बसंतीने लग्न ठरविले. तिचे वडील तिला म्हणाले, तू लग्न ठरवलंस याला माझा विरोध नाही पण एक विचारू?

बसंती : विचारा बाबा.

तिचे वडील : त्याच्याकडे चांगलं डबोलं वगैरे आहे ना?

बसंती : हे काय बाबा, तुम्ही सगळे पुरुष इथून तिथून सारखेच. तो देखील मला हाच प्रश्न विचारत होता. तुझ्या बापाजवळ डबोलं आहे ना?

### संदेश

Badi Shiddat se chaha tha ki
uska Mobile recharge karu
Mai
magar muhalle ki 2 rechage
ki dukano me se 1 recharge
wala
uska Bhai Nikala aur 2 uska
mustanda boyfriend...

### सुविचार



हात उगारण्यासाठी नसतात उभारण्यासाठी असतात.

**– बाबा आमटे**


**संस्कृत सुभाषित**

**अरसिकेषु कवित्व निवेदनम, शिरसि लिख मा, लिख मा, लिख मा।।**

अर्थ – काव्यास्वाद घेण्यासाठी रसिकही तसेच जाणते असावे लगतात. ज्यांना त्या विषयातले काही कळत नाही, गोडी नाही, अशा ढम्म अरसिकांपुढे काव्यागायंन करण्याचा प्रसंग, हे परमेश्वरा, माझ्या नशिबात लिहू नको, असे कवी म्हणतो.

## मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. ९



### आडवे शब्द

१. दिवसाची चाकोरी (ला.)
५. तडीपार
७. बहुदा उसने बळ
९. जुगाराचा एक प्रकार
१०. अमावस्या
११. गांधीजींच्या आंदोलनाचा मार्ग
१२. गंध
१४. नजरकैद, अटक
१६. योग्य, बरोबर
१८. संताप
१९. रूक्ष, कोरडे
२२. सेवक
२३. मृत्यू नसलेला
२४. बातमी
२५. उत्तरदायित्त्व, जोखीम
२७. किरकोळ सामान
३०. भार, बोजा
३१. शेवटचा पांडव
३३. गाडीचे छत
३५. विजार
३६. वरपांगी
३८. वटवट, त्रास
३९. पदर
४१. दरवाजा
४२. आरोप
४३. सवय, उत्तर दिशा
४४. देवाण-घेवाण
४८. आस, अक्ष
४९. बडबड्या
५०. प्रेत
५२. निवासस्थान
५३. सर्वांना सारखे प्रमाण
५५. रेचक
५६. वागणूक
५७. किंमत
५८. नवीन आलेला
६०. लहानच्या विरुद्ध
६१. कोवळ्या दुधाचा पदार्थ
६२. दिवसभराचे एकूण काम
६४. यापेक्षा चांगला गोंद कुठला?
६६. भांडण
६७. मस्ती, जोम
६८. पोते शिवण्याची जाड सुई
६९. खोदकाम
७१. पोपट
७३. सैन्याचा दाणागोटा
७४. वाळवी, उणीव
७५. अनौपचारिक सहभोजन

### उभे शब्द

१. रम्य
२. बाजार
३. बंगाली रुपाया
४. घर सोडून निघून जाणे
५. मावळ्यांची युद्धातील घोषणा
६. मर्यादा
७. स्थिती, दशा
८. वस्त्र, कापड
११. मध्यम प्रमाण
१३. '--मंद झाल्या तारका, आता तरी येशील का'
१५. सह, सोबत
१७. थापा मारणारा
२०. आवाजातील घोगरेणा
२१. सज्ज
२२. मोठा भाऊ
२४. धडपड, प्रयत्न
२५. आजूबाजूला
२६. पावाचा गोल प्रकार
२८. धडक
२९. स्पष्ट, रोखठोक बोलणारा
३१. संतोष आनंद
३२. आशीर्वाद
३४. अंदाज, तर्क
३७. नवरदेव
४०. चटकन
४२. सजावट
४४. अवडंबर, धैर्य
४५. उंबरठा
४६. सचिव, मुख्य
४७. किंमत
४८. अंब्याचे मिष्टान्न
४९. चणचण, न्यूनता
५१. मुलगा किंवा मुलगी
५३. चांगली वागणूक
५४. मोबदल्याची अपेक्षा नसलेले पद, हुद्दा इ.
५५. धनको
५९. मरेपर्यंत
६०. मोजणी
६१. हास्याचे पीक
६३. सुसर
६४. उत्सव
६५. फुलातील पुंकेसर
७०. पुरुष
७२. वैताग (ला.)

### आडवे उत्तर

१.रहाटगाडगे ५.हद्दपार ७.अवसान ९.मटका १०.अवस ११.सत्याग्रह १२.वास १४.स्थानबद्ध १६.यथार्थ १८.राग १९.रखरखीत २२.दास २३.अमर २४.रबर २५.जबाबदारी २७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप ३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव ४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान ४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम ५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर ५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.कामकाज ६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण ६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर ७५.अंगतपंगत

### उभे उत्तर

१.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग ५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था ८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर १७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा २४.खटपट २५.जवळपास २६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ ३१.समाधान ३२.वरदान ३४.अटकळ ३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव ४५.दारवठा ४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस ४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन ५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात ६०.मोजदाद ६१.खसखस ६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर ७२.वात



# क्रीडा विश्व



## ७ चेंडूत ५ विकेट्स पटकावल्या; पाकिस्तानच्या गोलंदाजाचा कहर

दिल्ली-पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि युएई यांच्यात ट्राय सिरीज खेळवण्यात आली. यामध्ये सिरीजमध्ये पाकिस्तानच्या संघाने बाजी मारली. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात काल अंतिम सामना खेळवण्यात आला. या सामन्यात पाकिस्तानने अफगाणिस्तानवर ७५ धावांनी विजय मिळवला. अंतिम सामन्यात पाकिस्तानचा अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नवाजने अफगाणिस्तानच्या फलंदाजांची दाणादाण उडवली.

आशिया कप २०२५ च्या स्पर्धे आधी पाकिस्तान क्रिकेट संघाचा अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नवाजने टी-२० क्रिकेटमध्ये कहर केल्याचे पाहायला मिळाले. मोहम्मद नवाजने गोलंदाजीत हॅट्ट्रिकसह एकूण ५ विकेट्स घेतल्या आणि पाकिस्तानला ७५ धावांनी मोठा विजय मिळवून दिला. या कामगिरीने पाकिस्तानने केवळ ट्रॉफी जिंकली नाही तर आगामी आशिया कपसाठी एक मजबूत संदेशही दिला.

थ,थ,थ,थ,थ...७ चेंडूत ५ विकेट्स-अंतिम सामन्यात मोहम्मद नवाज सहाव्या षटकात गोलंदाजी करण्यासाठी आला. नवाजने षटकाच्या पहिल्या ४ चेंडूत फक्त १ धाव दिली आणि नंतर शेवटच्या दोन चेंडूंवर सलग दोन फलंदाजांना बाद केले. षटकाच्या पाचव्या चेंडूवर नवाजने दरविश रसूलीला बाद केले आणि पुढच्याच चेंडूवर त्याने अझमतुल्लाह उमरझाईची विकेट घेतली. ज्यामुळे तो हॅट्ट्रिकच्या जवळ पोहोचला. त्यानंतर ८ व्या षटकात, जेव्हा नवाज गोलंदाजी करायला परतला तेव्हा यष्टीरक्षक मोहम्मद हॅरिसने पहिल्याच चेंडूवर इब्राहिम झद्रानची विकेट घेतली. नवाजने त्याच्या शानदार गोलंदाजीने हॅट्ट्रिक पूर्ण करून इतिहास रचला. नवाजच्या गोलंदाजीची जादू इथेच थांबली नाही. त्याने पुढच्या काही चेंडूंमध्ये चौथी विकेट घेतली आणि नंतर त्याच्या शेवटच्या षटकांत अफगाणिस्तानचा कर्णधार राशीद खानला बाद करून ५ विकेट्स घेण्याचा विक्रम केला. अशा पद्धतीने सात चेंडूत नवाजने ५ विकेट्स पटकावल्या.

अंतिम सामन्यात अफगाणिस्तानचा लाजिरवाणा पराभव-पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना १४२ धावा केल्या होत्या. १४२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, नवाजच्या फिरकी आणि पाकिस्तानच्या अचूक गोलंदाजीसमोर संपूर्ण अफगाणिस्तान संघ १५.५ षटकांत फक्त ६६ धावांवर बाद झाला. नवाज व्यतिरिक्त, अबरार अहमद आणि सुफियान मुकीम यांनीही २-२ विकेट्स घेत विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

९ सप्टेंबरपासून रंगणार आशिया चषकाचा थरार, संपूर्ण वेळापत्रक:
९ सप्टेंबर (मंगळवार) : अफगाणिस्तान विरुद्ध हाँगकाँग
१० सप्टेंबर (बुधवार) : भारत विरुद्ध युएई.



## बिसीसीआय गुगली टाकणार, भारताचा महान फिरकीपटू अध्यक्षपदी बसवणार?

दिल्ली-आशिया कप २०२५ च्या अगोदरच बीसीसीआयमध्ये मोठी उलथापालथ दिसत आहे. रॉजर बिन्नी यांनी बीसीसीआय अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून, पुढील निवडणुकीपर्यंत उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांच्याकडे कार्यवाहक अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बीसीसीआयच्या घटनेनुसार, वयाच्या ७० व्या वर्षानंतर कोणत्याही अधिकाऱ्याला आपले पद सोडावे लागते. याच कारणामुळे रॉजर बिन्नी यांनी बीसीसीआय अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे बीसीसीआयच्या पुढील अध्यक्षपदी कोणाची निवड होणार याची सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे.

बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि निवडणूक २८ सप्टेंबरला होणार आहे. त्याच दिवशी नव्या अध्यक्षांची निवड होईल. मात्र त्याआधी एक महत्वाची माहिती समोर आली आहे. भारतीय क्रिकेटचा माजी महान फिरकीपटू अनिल कुंबळे याची बीसीसीआयच्या अध्यक्षपदी निवड होणार असल्याची चर्चा सध्या रंगताना दिसत आहे. तसेच भारताचा दिग्गज खेळाडू सचिन तेंडुलकरच्या नावाची देखील चर्चा आहे. त्यामुळे बीसीसीआयच्या अध्यक्षपदी नेमकी कोणाची निवड होणार, याची उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

कोण आहे अनिल कुंबळे?, पाहा क्रिकेटमधील कारकीर्द-

अनिल कुंबळे हे भारताचे माजी क्रिकेटपटू, कर्णधार आणि प्रशिक्षक असून क्रिकेट इतिहासातील सर्वोत्कृष्ट फिरकीपटूंमध्ये त्यांचा समावेश होतो. क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी प्रशिक्षक आणि समालोचक म्हणून काम करायला सुरुवात केली आहे. १८ वर्षाच्या त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीमध्ये ते १३२ कसोटी सामने आणि २७१ एकदिवसीय सामने खेळले. कसोटी सामन्यांच्या इतिहासामध्ये भारताकडून खेळणाऱ्या सर्वात्कृष्ट फिरकीपटूंपैकी एक आहेत. त्यांनी कसोटी क्रिकेटमध्ये ६१९ गडी बाद केले आहेत, तर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये त्यांनी ३३७ बळी घेतले होते. १९९३ मध्ये त्यांची 'क्रिकेटर ऑफ द इयर' म्हणून निवड झाली होती. २०१६ ते २०१७ पर्यत ते भारताच्या क्रिकेट संघाचे प्रशिक्षक होते.





बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण सभा कधी?- २८ सप्टेंबर २०२५ रोजी बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण सभा होणार आहे.- मुंबई येथील बिसीसीआय मुख्यालयात सकाळी ११:३० वाजता ही सभा होईल.

- बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संयुक्त सचिव, कोषाध्यक्ष अशा पदांसाठी निवडणूक होणार आहे.
- विशेष म्हणजे बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण सभा आशिया चषकाच्या फायनल सामन्याच्या दिवशीच होणार आहे.

रॉजर बिन्नी यांची कारकीर्द-

रॉजर बिन्नी १९८३ मध्ये एकदिवसीय वर्ल्ड कप जिंकणाऱ्या संघाचे सदस्य आहेत. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २७ कसोटी व ७२ एकदिवसीय सामने खेळले. कसोटीत त्यांनी ४७ बळी मिळवले असून, दोन वेळा पाच बळींची कामगिरी केली आहे. तर एकदिवसीय सामन्यांत त्यांनी ७७ बळी घेतले आहेत. रॉजर बिन्नी यांना २०२२ मध्ये टीम इंडियाचे माजी कर्णधार सौरव गांगुलीच्या जागी बीसीसीआयचे अध्यक्ष बनवण्यात आले. सौरव गांगुली २०१९ ते २०२२ पर्यत बीसीसीआयचे अध्यक्ष होते. बीसीसीआयची जबाबदारी स्वीकारणारे बिन्नी हे तिसरे माजी क्रिकेटपटू आहेत.

## युएस ओपन च्या अंतिम सामन्यातून ट्रम्प अर्ध्यावरच का निघून गेले?

नवी दिल्ली-युएस ओपन या अतिशय मानाच्या समजल्या जाणाऱ्या टेनिस विश्वातील ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये अनेक मान्यवरांनी प्रेक्षक म्हणून हजेरी लावल्याचं पाहायला मिळाले. या स्पर्धेच्या पुरुष एकेरीमधील अंतिम सामन्यात स्पेनच्या कार्लोस अल्काराजने इटलीच्या यानिक सिनरचा पराभव केला आणि २०२२ नंतर पुन्हा एकदा या स्पर्धेचे जेतेपद आपल्या नावे केले. अल्काराजच्या कारकिर्दीतील हे सहावं ग्रँडस्लॅम असून, त्याने ही स्पर्धा गाजवली. असे असले तरीही अल्काराजसोबतच आणखी एका व्यक्तीने या अंतिम सामन्यात उपस्थितांच्या नजरा वळवल्या. ती व्यक्ती म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प.न्यूयॉर्कमधील आर्थर एश स्टेडियममध्ये जेव्हा ट्रम्प पोहचले तेव्हा त्यांच्याप्रती इतर उपस्थित प्रेक्षकांची संमिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळाली. काहींनी ट्रम्प यांच्या येण्याचे स्वागत टाळ्या वाजवून केले तर काहींनी मात्र त्यांच्याप्रती चिथावणीखोर प्रतिक्रिया, आवाज आणि हावभाव केल्याचेसुद्धा पाहायला मिळाले. एखाद्या व्यक्तीला चिडवण्यासाठी केला जाणारा आवाज काहींनी काढला आणि हे खुद्द ट्रम्प



यांच्यासाठीसुद्धा अनपेक्षितच होते.नाचक्की झाली आणि काय होती ट्रम्प यांची प्रतिक्रिया?

न्यूयॉर्कमध्ये असे काही घडेल याची खुद्द ट्रम्प यांनाही कल्पना नव्हती. राजकीय भूमिकांमुळे ट्रम्प यांना या विचित्र विरोधाचा सामान करावा लागला हे यामागचे एक कारण, तर दुसरे कारण म्हणजे सामन्यासाठी ट्रम्प येणार कळतात तिथे सुरक्षा व्यवस्थेत तातडीने काही बदल करावे लागले. ज्यामुळं प्रेक्षकांना लांबच लांब प्रतीक्षा रांगेत उभे रहावे लागले. काहींना सामना सुरू होऊनही कोर्टवर पोहोचला आले नाही. याच कारणास्तव संतप्त प्रेक्षकांनी आपला संताप अशा पद्धतीने व्यक्त केला.

कोर्टवर एकिकडे सामना दुसरीकडे...सामना सुरु होण्याआधी साधारण ४५ मिनिटांपूर्वी ट्रम्प सूट आणि लाल रंगाच्या टायसह व्हीआयपी सुईटमधून बाहेर आले आणि त्याच क्षणी काही संमिश्र प्रतिक्रिया पाहून त्यांचेही डोळे चमकले.

## आशिया कप जिंकवला त्यांनाच बाहेर केले, टीम इंडियातून गायब झाले ७ खेळाडू

मुंबई-१७ सप्टेंबर २०२३, याच दिवशी टीम इंडियाने श्रीलंकेचा १० विकेटने पराभव करून आशिया कप २०२३ मध्ये विजय मिळवला. आता २०२५ च्या आशिया कपला ९ सप्टेंबरपासून सुरूवात होत आहे, पण या २ वर्षामध्ये टीम इंडियाचा चेहरामोहराच बदलून गेला आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासह ७ खेळाडू टीम इंडियामधून गायब झाले आहेत. २०२३ च्या आशिया कप फायनलमध्ये श्रीलंकेची टीम पहिले बॅटिंगला उतरली आणि त्यांचा फक्त ५० रनवर ऑल आऊट झाला. या आव्हानाचा पाठलाग टीम इंडियाने फक्त ३७ बॉलमध्येच केला आणि ट्रॉफीवर नाव कोरलं. या सामन्यात एकट्या मोहम्मद सिराजने ६ विकेट घेतल्या आणि हार्दिक पांड्याला ३ विकेट मिळाल्या.२०२३ आशिया कप फायनलची प्लेयिंग इलेव्हन इशान किशन, शुभमन गिल, रोहित शर्मा, विराट कोहली, केएल राहुल, हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज

७ खेळाडू झाले गायब.२०२५ च्या आशिया कप स्क्वॅडमधून ७ खेळाडू गायब आहेत, जे २०२३ आशिया कपच्या फायनलमध्ये खेळले होते. यात विराट कोहली आणि रोहित शर्मा ही दोन मोठी नावं आहेत, ज्यांनी टी-२० आंतरराष्ट्रीय मधून निवृत्ती घेतली आहे. तर मोहम्मद सिराज इंग्लंड दौऱ्यातल्या थकव्यामुळे विश्रांती देण्यात आली आहे. इशान किशन नोव्हेंबर २०२३ नंतर टीम इंडियाकडून खेळलेला नाही, तर केएल राहुलची टीममध्ये निवड झालेली नाही. वॉशिंग्टन सुंदर इंग्लंड दौऱ्यात चांगल्या फॉर्ममध्ये होता, पण त्याचीही आशिया कपसाठी टीम इंडियात निवड झालेली नाही.

टीममध्ये नसलेले ७ खेळाडू
इशान किशन, रोहित शर्मा, विराट कोहली, केएल राहुल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, मोहम्मद सिराज

आशिया कप २०२५ साठी टीम इंडिया
सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षीत राणा, रिंकू सिंग

## तब्बल १६ भारतीय खेळाडू मैदानात, कर्णधार मात्र पाकिस्तानचा

### आशिया कपमध्ये पाहायला मिळणार अजब सामना

दिल्ली,८ सप्टेंबर (पीएसआय)
आशिया कप २०२५ ही स्पर्धा मंगळवार ९ सप्टेंबर पासून सुरु होणार आहे. यात भारतीय संघाचा पहिला ग्रुप स्टेज सामना यूएई विरुद्ध १० सप्टेंबर रोजी खेळवला जाणार असून या सामन्यात तब्बल १६ भारतीय खेळाडू मैदानात उतरण्याची शक्यता आहे. याचं कारण म्हणजे भारताचा सामना हा यूएई विरुद्ध जरी होत असला तरी यूएई बोर्डाने आशिया कपसाठी जाहीर केलेल्या संघात तब्बल ५ खेळाडू हे भारतीय आहेत, तर त्यांचा कर्णधार हा पाकिस्तानी आहे. त्यामुळे जर का यूएई संघाच्या प्लेईंग ११ मध्ये त्या ५ भारतीय खेळाडूंना खेळण्याची संधी मिळाली तर आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात प्रथमच १६ भारतीय खेळाडू मैदानात उतरतील.

आशिया कपमध्ये ८ संघांचा समावेश : आशिया कप २०२५ मध्ये यंदा ८ संघांचा समावेश असणार आहे. या ८ संघांना दोन गटात विभागण्यात आलं असून ग्रुप एमध्ये भारत, पाकिस्तान, यूएई, ओमन तर ग्रुप बी - बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग यांचा समावेश आहे. प्रत्येक गटातील अव्वल संघ पुढील फेरीत प्रवेश करतील, आणि अंतिम सामना २८ सप्टेंबर २०२५ रोजी होईल. ग्रुप एमध्ये भारत, पाकिस्तान, यूएई, ओमन तर ग्रुप बी - बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग यांचा समावेश आहे.

युएई संघात किती भारतीय खेळाडू?
युएई बोर्डाने आशिया कप २०२५ साठी त्यांच्या १७ खेळाडूंचा संघ जाहीर केलेला आहे. यापैकी ५ खेळाडू हे भारतीय आहेत तर यूएईचा कर्णधार असलेला मोहम्मद वसीम हा मूळचा पाकिस्तानी खेळाडू आहे. युएई बोर्डाने आशिया कपसाठी जाहीर केलेल्या संघात सिमरनजीत सिंग, हर्षित कौशिक, ध्रुव पराशर, आर्यश शर्मा, अलिशन शरफु हे भारतीय वंशाचे खेळाडू आहेत. ध्रुव पराशर या खेळाडूचा जन्म पुण्यात झाला तर अलिशन शरफुचा जन्म तिरूवअनंतपुरम येथे आहे.

भारत विरुद्ध यूएईचा सामना कुठे पाहाल?
दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर बुधवार १० सप्टेंबर रोजी भारत विरुद्ध यूएई यांच्यात सामना होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता सुरु होईल. आशिया कप २०२५ च्या सामन्यांचे लाईव्ह टेलिकास्ट सोनी स्पोर्ट्स चॅनलवर होईल. तर ऑनलाईन युझर्स सोनी ॲप तसेच वेबसाईटवर या सामन्यांचं लाईव्ह स्ट्रीमिंग पाहू शकतात. भारतातील फ्री डिश वापरणारे प्रेक्षक डीडी स्पोर्ट्सवर सामना मोफत पाहू शकतील. मल्टीनेशनल स्पर्धामध्ये, डीडी स्पोर्ट्स भारताच्या सामन्यांव्यतिरिक्त महत्त्वाचे सामने मोफत दाखवते.

भारत संघ :सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, जितेश शर्मा, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंह, कुलदीप यादव, संजू सैमसन, हर्षित राणा, रिंकू सिंह

यूएई संघ :मोहम्मद वसीम (कर्णधार), अलीशन शराफू, आर्यश शर्मा (विकेटकीपर), आसिफ खान, ध्रुव पराशर, ईथन डी'सूजा, हैदर अली, हर्षित कौशिक, जुनैद सिद्दीकी, मतीउल्लाह खान, मोहम्मद फारूक, मोहम्मद जवदुल्लाह, मोहम्मद जोहेब, राहुल चोपत्रडा (विकेटकीपर), रोहिद खान, सिमरनजीत सिंह, सगीर खान

## ना सचिन, ना रोहित - विराट; हा आहे ख्रिस गेलचा आवडता भारतीय क्रिकेटर, नाव ऐकून तुम्हीही थक्क व्हाल

दिल्ली-क्रिकेट विश्वात मयुनिवर्सल बॉसफ म्हणून प्रसिद्ध असलेला वेस्ट इंडिजचा विस्फोटक फलंदाज ख्रिस गेल (ण्पी उरब्त) याने नुकताच एका भारतीय युट्युबरला मुलाखत दिली. या मुलाखतीत आयपीएल आणि इंडियन क्रिकेट संघाबाबत त्याने अनेक खुलासे केले. यादरम्यान त्याला प्रश्न विचारण्यात आला की तुझा आवडता भारतीय क्रिकेटर कोणता? यावर उत्तर देताना तो रोहित, विराट, सचिन सारख्या दिग्गज क्रिकेटर्सची नाव घेईल असं वाटत असताना त्याने एका युवा फलंदाजाचं नाव घेतलं. यासोबतच त्याने या युवा खेळाडूकडे भारतीय संघाचे सिलेक्टर्स लक्ष देत नसल्याचं देखील नमूद केलं.

कोण आहे ख्रिस गेलचा आवडता भारतीय क्रिकेटर?
शुभंकर मिश्राच्या पॉडकास्टमध्ये ख्रिस गेलला प्रश्न विचारण्यात आला की तुझा आवडता भारतीय क्रिकेटर कोण आहे? यावर त्याने सरफराज खानचं नाव घेतलं. दरम्यान गेल ने २७ वर्षाच्या सर्फराज खानला पुन्हा भारतीय टेस्ट संघात सामील केलं जावं असा सल्ला भारतीय सिलेक्टर्सला दिला. गेल आणि सर्फराज खान हे दोघे आयपीएलमध्ये पंजाब किंग्ससाठी खेळले आहेत. गेलने सोशल मीडियावर सरफराज



खानला बदललेल्या रूपात पाहिलं. तसेच गेलने भारतीय सिलेक्टर्सला फटकारले आणि त्यांच्यावर सरफराजचे वजन हा मुद्दा बनवल्याचा आरोप केला. इंग्लंडमधील अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीसाठी सरफराजची टेस्ट संघात निवड झाली नव्हती. त्याने यापूर्वी भारतासाठी ६ टेस्ट सामने खेळले असून यात ३७.१० च्या सरासरीने ३७१ धावा केल्या आहेत.


नेमकं काय म्हणाला ख्रिस गेल?
गेल ने शुभंकर मिश्राच्या पॉडकास्टवर बोलताना म्हटले, त्याला (सरफराज खान) संघात असायला हवं होतं. त्याला कमीत कमी टेस्ट संघात असायला हवं होतं. त्याने इंग्लंड विरुद्ध भारतात झालेल्या सामन्यात शतक लगावलं होतं, परंतु तरी देखील त्याला संघात स्थान मिळालं नाही. काही दिवसांपूर्वी मी एक पोस्ट पाहिली. ज्यात त्याचे वजन कमी झाले होते. त्याला त्याच्या वजनाची किंवा इतर कोणत्याही गोष्टीची कोणतीही समस्या नव्हती. तो पूर्णपणे ठीक आहे. तो अजूनही धावा करत आहे. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्रिशतक झळकावले. त्यामुळे जर ते वजनावर प्रश्न उपस्थित करून याचा त्याच्या विरुद्ध वापर करत असतील तर ते दुःखद आहे. त्यांनी त्याचा वापर त्याच्याविरुद्ध कधीही करू नये. तो तरुण खेळाडू १०० टक्के संघाचा भाग असला पाहिजे. भारतात खूप प्रतिभा आहे पण त्याला संधी देण्यात आली पाहिजेफ

सरफराज खानला दुखापत :
हरियाणा विरुद्धच्या बुची बाबू स्पर्धेत सरफराज खानला नुकतीच दुखापत झाली होती. त्याने स्पर्धेत दोन शतके झळकावली. दुखापतीमुळे त्याला दुलीप ट्रॉफी २०२५ मधून बाहेर पडावे लागले. १६ सप्टेंबरपासून लखनौमध्ये सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्धच्या दोन सामन्यांच्या सराव टेस्ट सीरिज सीरिजसाठी त्याला भारत अ संघात स्थान देण्यात आलेले नाही. सरफराज खानने नोव्हेंबर २०२४ मध्ये भारतीय संघासाठी शेवटचा टेस्ट सामना खेळला. ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी त्याला भारतीय संघात स्थान मिळाले पण त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही.

## रोहित, विराटसाठी मलालबागचा राजाच्या चरणी स्पेशल चिठ्ठी; इच्छा वाचून फॅन्स म्हणाले..

मुंबई -भारतीय क्रिकेट संघाचे 'शुभमन गिल' पर्व सुरु झाले असल्याची चर्चा आहे. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेमध्ये शुभमन गिलने कर्णधार म्हणून आपल्या पहिल्याच दौऱ्यावर कामगिरीची छाप सोडली. कसोटीप्रमाणेच एकदिवसीय सामन्यांमधील कर्णधारपदही शुभमनकडे सोपवले जाईल असे सांगितले जात आहे. असे असतानाच दुसरीकडे रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचे २०२७ चा एकदिवसीय सामन्यांचा वर्ल्डकप खेळणं कठीण असल्याची चर्चा आहे. वर्ल्डकपसाठी आतापासूनच संघ बांधणी सुरु असून त्यानुसारच खेळाडूंना संधी दिली जात असल्याने कसोटी आणि टी-२० मधून निवृत्त झालेल्या विराट आणि रोहितला पुन्हा संघात कधी आणि कसं स्थान मिळणार याबद्दलचा संभ्रम कायम आहे. असं असतानाच मुंबईतील प्रसिद्ध लालबागचा राजाच्या चरणी एका भारतीय क्रिकेट चाहत्याने 'शेवटची मागणी' म्हणत रोहित आणि विराटसंदर्भात एक फारच खास मागणी केली आहे. सध्या इंटरनेटवर हा व्हिडीओ व्हायरल होतोय.

चिठ्ठी ठेवण्याचा ट्रेण्ड
'नवसाला पावणारा' अशी ख्याती असलेला 'लालबागचा राजा' हा कोट्यवधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान आहे. लालबागचा राजाच्या दरबारामध्ये मागितलेली प्रत्येक मागणी पूर्ण होते असा भक्तांचा विश्वास आहे. याच विश्वासाचा भाग म्हणून मागील काही वर्षापासून मनातील गोष्ट लिहून थेट राजाच्या पायावर ठेवण्याचा एक नवा ट्रेण्ड पाहायला मिळत आहे. मागील वर्षी 'लालबागचा राजा' मंडळाचे मानद सचिव





सुधीर साळवी यांना विधानसभेसाठी उमेदवारी मिळावी अशी चिठ्ठी शेवटच्या दिवशी लालबागचा राजाच्या पायाशी सापडली होती. यंदा मात्र अशीच एक चिठ्ठी रोहित आणि विराटसंदर्भात सापडली आहे.

काय आहे या चिठ्ठीत?
या चिठ्ठीमध्ये क्षेंदख्द वापरण्यात आला आहे. रोहित आणि कोहली या दोघांसाठी एकत्रितपणे वापरला जाणारा हा हॅशटॅग आहे. या चिठ्ठीमध्ये, ''रोहित शर्माने कर्णधार म्हणून २०२७ चा वर्ल्डकप जिंकावा आणि विराट कोहलीचं शतकांचं शतक पूर्ण व्हावं,'' अशा दोन इच्छा लिहिलेल्या दिसत आहेत. लालबागच्या राजाच्या चरणाजवळ गुलाबाचे फूल आणि ही चिठ्ठी चाहता ठेवत असल्याचा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर कॉटन जिमखाना नावाच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन पोस्ट करण्यात आला आहे. या व्हिडीओवर 'बाप्पा ही आमची शेवटची इच्छा आहे,' असे लिहिलेले आहे. पुढच्या वर्षी पुन्हा भेटेपर्यंत या इच्छेसंदर्भात काहीतरी सकारात्मक बातमी मिळावी, असा मजकूर या पोस्टसोबत लिहिण्यात आला आहे.

अनेकांनी या व्हिडीओखाली कमेंट बॉक्समध्ये रोहित शर्माने २०२७ च्या वर्ल्ड कप फायनलमध्ये द्विशतक झळकवावं आणि भारत जिंकावा असे म्हटले आहे. काहींनी लालबागचा राजाला या मागणीसाठी 'प्लीज तथास्तू म्हण देवा' अशी गळ घातल्याचे पाहायला मिळत आहे.



# मध्य रेल्वे २०२५ च्या दसरा आणि दिवाळी उत्सवादरम्यान सोलापूर विभागातून २३० विशेष गाड्या चालवणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** आगामी दसरा आणि दिवाळी उत्सवादरम्यान प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने सोलापूर विभागातून विविध ठिकाणी २३० विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे, ज्याची माहिती खाली दिली आहे:

लातूर – हडपसर विशेष गाड्या (७४ फेऱ्या)
– ट्रेन क्रमांक ०१४२९ विशेष ट्रेन २६.०९.२०२५ ते २८.११.२०२५ पर्यंत दर सोमवार, मंगळवार, बुधवार आणि शुक्रवारी लातूरहून सकाळी ९.३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता हडपसरला पोहोचेल. (३७ फेऱ्या
– ट्रेन क्रमांक ०१४३० ही विशेष गाडी २६.०९.२०२५ ते २८.११.२०२५ पर्यंत दर सोमवार, मंगळवार, बुधवार आणि शुक्रवारी हडपसर येथून दुपारी ४.०५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री ९.२० वाजता लातूरला पोहोचेल. (३७ फेऱ्या)

थांबे: हरंगुल, मुरुड, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी, जेउर आणि दौंड.

रचना: १ एसी फर्स्ट क्लास, २ एसी–२ टियर, ४ एसी–३ टियर, ८ स्लीपर क्लास, ४ जनरल सेकंड क्लास आणि २ जनरल सेकंड क्लास कम गार्ड ब्रेकव्हॅन. (२१ डबे)

एलटीटी मुंबई – लातूर साप्ताहिक विशेष (२० फेऱ्या)
– ट्रेन क्रमांक ०१००७ साप्ताहिक विशेष २८.०९.२०२५ ते ३०.११.२०२५ पर्यंत दर रविवारी एलटीटी मुंबईहून रात्री १२.५५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी १.३० वाजता लातूरला पोहोचेल. (१० फेऱ्या)
– ट्रेन क्रमांक ०१००८ साप्ताहिक विशेष २८.०९.२०२५ ते ३०.११.२०२५ पर्यंत दर रविवारी दुपारी ४.०० वाजता लातूरहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०४.५० वाजता एलटीटी मुंबईला पोहोचेल. (१० फेऱ्या)

थांबे: ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, कुर्डुवाडी आणि धाराशिव.

रचना: ३ एसी– टियर, १० स्लीपर क्लास, ५ जनरल सेकंड क्लास, २ जनरल सेकंड क्लास कम गार्ड ब्रेक व्हॅन. (२० डबे)

दौंड – कलबुरगि अनारक्षित आठवड्यातून ५ दिवस विशेष (९६ फेऱ्या)
– ट्रेन क्रमांक ०१४२१ अनारक्षित विशेष २६.९.२०२५ ते १.१२.२०२५ पर्यंत दर सोमवार, मंगळवार, बुधवार, शुक्रवार आणि शनिवारी दौंड येथून



सकाळी ५.०० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी सकाळी ११.२० वाजता कलबुरगि येथे पोहोचेल. (४८ फेऱ्या)
– ट्रेन क्रमांक ०१४२२ अनारक्षित विशेष २६.९.२०२५ ते १.१२.२०२५ पर्यंत दर सोमवार, मंगळवार, बुधवार, शुक्रवार आणि शनिवारी कलबुरगि येथून दुपारी ४.१० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री १०.२० वाजता दौंड येथे पोहोचेल. (४८ फेऱ्या)

थांबे: भिगवण, पारेवाडी, जेऊर, केम, कुर्डुवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, टिकेकरवाडी, होटगी, अक्कलकोट रोड, बोरोटी, दुधनी आणि गाणगापूर रोड.

रचना: १० सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ द्वितीय श्रेणीसह सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन (१२ कोच)

दौंड – कलबुरगि अनारक्षित द्वि–आठवड्यातील विशेष गाड्या (४० फेऱ्या)
– ट्रेन क्रमांक ०१४२५ अनारक्षित विशेष ट्रेन २५.९.२०२५ ते ३०.११.२०२५ पर्यंत दर गुरुवार आणि रविवारी दौंडहून सकाळी ५.०० सुटेल आणि त्याच दिवशी सकाळी ११.२० वाजता कलबुरगिला पोहोचेल. (२० फेऱ्या)
– ट्रेन क्रमांक ०१४२६ अनारक्षित विशेष ट्रेन २५.९.२०२५ ते ३०.११.२०२५ पर्यंत दर गुरुवार आणि रविवारी कलबुरगि येथून रात्री ८.३० वाजता सुटेल आणि दौंडला दुसऱ्या दिवशी सकाळी २.३० वाजता पोहोचेल. (२० फेऱ्या)

थांबे: भिगवण, पारेवाडी, जेऊर, केम, कुर्डुवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, टिकेकरवाडी, होटगी, अक्कलकोट रोड, बोरोटी, दुधनी आणि गाणगापूर रोड.

रचना: १० सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ द्वितीय श्रेणीसह सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन. (१२ कोच)

आरक्षण आणि बुकिंग: विशेष शुल्कासह विशेष गाड्यांचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर उपलब्ध आहे.

अनारक्षित कोचचे बुकिंग स्थानकांवर असलेल्या बुकिंग काउंटरद्वारे आणि अ‍ॅपद्वारे देखील करता येते. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात येत आहे.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांविषयी तपशीलवार माहितीसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES अ‍ॅप डाउनलोड करा.

## बोरगावकर पिता - पुत्रांच्या कलाविष्काराने छत्तीसगड श्रोते मंत्रमुग्ध



**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या सांस्कृतिक विभाग तसेच छत्तीसगड शासन व संस्कृती पर्यटन विभागाच्या वतीने छत्तीसगड मधील रायगड जिल्हा येथे आयोजित आंतरराष्ट्रीय महाराजा चक्रधर संगीत समारोह २०२५ या कार्यक्रमात महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कलावंत तालमणी डॉ.राम बोरगावकर व सिने पार्श्वगायक मंगेश बोरगावकर यांच्या अनोख्या कलाविष्काराने छत्तीसगढ येथील श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. सुर व तालांच्या उत्कट कलाविष्काराने महाराजा चक्रधर महोत्सवात बोरगावकर पिता–पुत्र यांनी आपल्या कलेचा सुवर्ण अध्याय रचला.

या आंतरराष्ट्रीय महोत्सवाच्या सुरुवातीस सुप्रसिद्ध कवी कुमार विश्वास यांचे संगीतमय कविता वाचन झाले. त्यानंतर लातूरहून खास निमंत्रित असलेले कलावंत तालमणी डॉ.राम बोरगावकर यांनी सोलो तबलावादनास आरंभ केला.त्यांनी गणेश ताल ११ मात्रा मध्ये उठाण, परन,बनारसी ठेका,गत, कायदा, चक्रधार सादर करून सर्व रसिकांची उत्स्फूर्त दाद घेतली.तसेच ताल तीनताल मध्ये बनारस घरणा वादन शैलीनुसार उठाण,त्रिपल्ली,पाचपल्ली, फरद यासारखे अनोखे तालाविष्कार सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

त्यानंतर सिने पार्श्वगायक मंगेश बोरगावकर यांनी राग बागेश्रीमध्ये धीर गंभीर आलापिने बडाख्याल सादर केला. त्यानंतर त्यांनी छोटा ख्याल व तराना सादर केला. त्यानंतर त्यांनी कार्यक्रमाच्या शेवटी बाजे रे मुरलिया बाजे हे भजन आपल्या सुमधुर आवाजात सादर करून संपूर्ण सभागृहाची उत्स्फूर्त दाद घेतली. शेवटी त्यांनी गायलेल्या विठ्ठल नामाच्या गजरात संपूर्ण सभागृह दुमदुमून निघाले.

या कार्यक्रमास रायगडचे महाराजा देवेंद्र प्रतापसिंहजी यांनी दोन्ही पिता पुत्रांना सत्कार करून सन्मानपत्र प्रदान केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुला/मुलींच्या विभागीय वसतिगृहात सायबर सेक्युरिटी कार्यशाळा उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'' हा उपक्रम लातूर जिल्ह्यामध्ये मागील तीन वर्षांपासून राबविला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी व तसेच शेतकऱ्यांसाठी, शासकीय कार्यालये, बँका, ग्रामपंचायत, महिला बचत गट, दवाखाने, साखर कारखाने, इत्यादी ठिकाणी या कार्यशाळेचे आयोजन केले जात आहे. याचाच भाग म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलां/मुलींच्या विभागीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सायबर सेक्युरिटी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत शाहू महाविद्यालयातील बी. एस्सी. सी. एस. तृतीय वर्षातील 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण या विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे सध्या घडत असलेले विविध सायबर गुन्हे जसे की फिशिंग, डिजिटल अरेस्ट, आर्थिक फसवणूक, सोशल मीडियाद्वारे फोटो किंवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर यांसारख्या सायबर गुन्ह्यांची माहिती विविध उदाहरणे देऊन सांगितले. तसेच, अनोळखी मेसेजेस व लिंक्सवर क्लिक न करणे, वैयक्तिक माहिती शेअर न करणे, आणि अशा गुन्ह्यांची सायबर सेलमध्ये नोंदणी कशी करावी, तसेच १९३० या हेल्पलाईन क्रमांकाबद्दल माहिती दिली.

याप्रसंगी श्री. अविनाश देवसटवार (उपायुक्त, समाज कल्याण, लातूर), श्री. यादव गायकवाड (सहा. आयुक्त, समाज कल्याण, लातूर), श्री. दत्ता बारगिरे (संचालक, विजय अकॅडमी, लातूर), श्री. विलास औटे आणि वसतिगृहातील इतर पदाधिकारी, स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## केशवराजमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा




**लातूर/प्रतिनिधी :** सप्टेंबर : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. ८ सप्टेंबर २०२५ सोमवार रोजी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा श्री केशवराज माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक प्रफुल्ल कुलकर्णी तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रफुल्ल कुलकर्णी असे म्हणाले, की देवाकडे जाण्याचा खरा मार्ग गुरु आहेत, त्यामुळे गुरुंविषयी नेहमी कृतज्ञता ठेवावी. याप्रसंगी त्यांनी पंचकोशातील अन्नमयकोश, प्राणमयकोश, विज्ञानमयकोश, आनंदमयकोश आणि मनोमयकोश यांची सविस्तर माहिती सांगितली. अभ्यासपूरक मंडळाच्या विविध कार्यक्रम, उपक्रमातून विद्यार्थ्यांचा पंचकोश विकसन साधावा असे सांगितले. याप्रसंगी विद्यार्थ्यांचा अंतर्गत विकास करून त्यांचे संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व निर्माण करावे, असे आवाहन शिक्षक दिनानिमित्त त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर म्हणाले, की शिक्षकी पेशाएवढा आनंददायी पेशा दुसरा कोणताही नाही. समाजातील अनेक पिढ्या घडवून समाज व देश घडविण्याचे कार्य शिक्षक करतात. त्यामुळे शिक्षकांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे, असे सांगून याप्रसंगी त्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी विद्यालयातील आठवी ते दहावी विभागातील सर्व शिक्षकांचा सन्मान विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत अमोल गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन नम्रता पंडित व अक्षरा भंडारे (१० वी ब) या विद्यार्थिनींनी केले तर आभार सुवर्णा कुलकर्णी यांनी मानले. शैला कुलकर्णी यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

ज्ञानोपासक मंडळांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख तेजस्विनी सांजेकर, कार्यक्रम प्रमुख अमोल गायकवाड तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लातूरमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी समितीची बैठक

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बस करीता विनियम) नियम २०११ च्या अधिसूचनेनुसार, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत आढावा घेण्यासाठी आणि नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीची बैठक झाली.

या बैठकीला महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक अश्वजित जानराव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) एस. डी. साळवे, वाहतूक नियंत्रण शाखेचे विठ्ठल दराडे तसेच शिक्षण विभाग आणि लातूर महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शालेय परिवहन समिती आणि शाळा प्रशासनाला सर्व शालेय वाहनांची वाहन योग्यता प्रमाणपत्र, विमा, परवाना, पीयुसी, चालक अनुज्ञप्ती आदी कागदपत्रे वैध असल्याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच, सर्व वाहनांवर स्पीड गव्हर्नर कार्यान्वित असल्याची तपासणी करावी. वैध कागदपत्रे नसलेली किंवा स्पीड गव्हर्नर नसलेली वाहने विद्यार्थी वाहतुकीसाठी वापरू नयेत, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या.

अवैधरित्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांना मज्जाव करून त्यांची माहिती परिवहन विभाग आणि पोलीस प्रशासनाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. अशा वाहतुकीत सहभागी शाळांवर शिक्षण विभागाने कारवाई करून अहवाल सादर करावा, असे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले.

## निलंगा येथे अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मनसेचे रास्ता रोको आंदोलन

### शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्या..डॉ. नरसिंह भिकाने



**निलंगा/आयुब बागवान :** लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी पुराच्या पाण्यामुळे खरडून गेल्या आहेत. त्यामुळे शेतकरी राजा उद्ध्वस्त झाला असून या शेतकऱ्याला सरकारने तातडीची एकरी पन्नास हजार रुपयांची नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी प्रशासनाकडे निलंगा कासारसिरसी मार्गावरील दादगी मोड येथे केलेल्या रास्तारोको आंदोलनादरम्यान बोलताना केली आहे.यावेळी मोठया संख्येने मनसे कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.शेतकऱ्यांच्या या नुकसानी कडे सरकार गांभीर्याने पाहत नाही, त्यामुळे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे हे भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार यांनी शेतकऱ्यांना अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांची माती,जनावरे, घरे,रस्ते वाहून गेल्यामुळे त्याच्यासमोर आत्महत्ये शिवाय पर्याय शिल्लक नसल्याचे सांगून तात्काळ सरसकट पंचनामे करण्याची मागणी केली.शेवटी प्रशासनाला निवेदन देऊन आंदोलन संपवण्यात आले.दीर्घ काळ चाललेल्या आंदोलनामुळे वाहतूक ठप्प झाल्याकारणाने पोलीस निरीक्षक सूर्यवंशी यांनी चोख बंदोबस्त ठेवत कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्याचीही कार्यवाही केली.सरकारने तातडीने मदत न केल्यास यापुढे आणखीन तीव्र आंदोलनाचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष डॉ.नरसिंह भिकाने यांनी यावेळी दिला आहे.


या आंदोलनात तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार,माजी तालुकाध्यक्ष सूरज पटेल,प्रदीप शेळके,तालुका सचिव गणेश उसनाळे,तालुकाउपाध्यक्ष विकास सूर्यवंशी, बालाजी पवार,सदाशिव हाडोळे, शिवराज चिंचोळे, सोमलिंग पाटील,कृष्णा सुरवसे, शुभम माने, बालाजी खिचडे, नर्सिंग महालिंग, महेश सावनगिरे, राहुल पाटील, मल्लिकार्जुन कुरळे, जीवन बोरुळे, व निलंगा तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निलंग्यात ईद–ए–मिलाद जयंती उत्साहात साजरी



**निलंगा/आयुब बागवान :** शहरात ईद–ए–मिलाद जयंती निमित्त मिरवणूक काढून पैगंबर जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

इस्लाम धर्माचे संस्थापक पैगंबर मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या ईद–ए–मिलाद जयंतीनिमित्त निलंगा शहरात मिरवणूक काढत मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.या मिरवणुकीदरम्यान मुस्लिम समाजाच्या या मंगल दिनानिमित्त पैगंबर मोहम्मद यांच्या शांतता, सहिष्णुता आणि मानवतेच्या शिकवणींचे स्मरण करून त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्यात आले. शहरातील हाडगा नाका, महाराष्ट्र कॉलेज, दत्तनगर कॉर्नर, आनंदमुनी चौक येथे अशा अनेक ठिकाणी सरबत आणि शिरा वाटून शुभेच्छांचे आदानप्रदान करण्यात आले. यानिमित्त अनेक मुस्लिम धर्मगुरूंनी पैगंबर मोहम्मद यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांच्या शांतता आणि बंधुत्वाच्या शिकवणींचे महत्त्व विशद केले. सर्व धर्मीयांबद्दल आदर राखणे, गरजूंची मदत करणे आणि समाजात सौहार्द निर्माण करणे या त्यांच्या प्रमुख शिकवणींचे स्मरण करण्यात आले. यावेळी ईद–ए–मिलाद जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली ही मिरवणुक शहरातील हाडगा नाका येथून सुरुवात करून छत्रपती शिवाजी महाराज चौक, मार्गे दत्तनगर, आनंदमुनी चौक ते पिरपाशा दर्गाह येथे आल्यानंतर दुआ (प्रार्थना) करून या मिरवणूकीची सांगता करण्यात आली. यावेळी अनेक धर्मगुरूसह शेकडो मुस्लिम समाज बांधव सहभागी झाले होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# मागासवर्गीय महिलांसाठी १०० टक्के अनुदानावर शिलाई कम पिको-फॉल मशीन योजना लाभ घेण्याचे आवाहन

धाराशिव, (जिमाका)-जिल्हा परिषद स्वसंपादीत उत्पन्नातील २० टक्के समाज कल्याण सेस योजनेअंतर्गत सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षात मागासवर्गीय महिलांना १०० टक्के अनुदानावर शिलाई कम पिको-फॉल मशीन देण्यात येणार आहेत.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पात्र महिलांनी आपला परिपूर्ण अर्ज गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्यामार्फत जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद, धाराशिव यांचेकडे दिनांक २६ सप्टेंबर २०२५ पर्यंत सादर करावा.

अर्जाचा विहीत नमुना,अटी-नियम व आवश्यक कागदपत्रांची माहिति सर्व पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकारी कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच अर्जाचे नमुने dharashiv.nic.in, www.zpdharashiv.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त मागासवर्गीय महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# शेतकरी गटांना पिक प्रात्यक्षिकांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका) -राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान (अन्नधान्य व वाणिज्यिक पिके) तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया) अंतर्गत रब्बी हंगाम २०२५ -२६ मध्ये गहू,कडधान्य,पौष्टिक तृणधान्य,ऊस, करडई,मोहरी व सूर्यफूल या पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पिक प्रात्यक्षिके राबविण्यात येणार आहेत. यासाठी कोणत्याही शासकीय यंत्रणेकडे ३१ मार्च २०२४ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट,शेतकरी उत्पादक कंपनी व कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था अर्ज करू शकतात. अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/-griLogin/-griLogin) बियाणे वितरण,प्रात्यक्षिक,फ्लेक्सी घटक,औषधे आणि खते या टाईल अंतर्गत सुविधा उपलब्ध आहे.अर्ज सादर करण्याची प्रक्रिया २ सप्टेंबर २०२५ पासून सुरू झाली आहे.

गटांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (ऋउऋड) या तत्त्वावर होणार असून,अर्ज करणाऱ्या व लाभ घेणाऱ्या सर्व सदस्यांचा ऋीशी खऊ अनिवार्य आहे.

जास्तीत जास्त शेतकरी गटांनी या योजनेअंतर्गत अर्ज करून पिक प्रात्यक्षिकांचा लाभ घ्यावा,असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

# अण्णाभाऊ साठे महामंडळाची थेटकर्ज योजना १० सप्टेंबर अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख

धाराशिव, (जिमाका) -साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.),मुंबई मार्फत सन २०२५ -२६ या आर्थिक वर्षाकरिता विविध अनुदान योजना राबविण्यात येत आहेत.अनुदान योजनेअंतर्गत ५० हजार रुपये प्रकल्प रक्कमेसाठी भौतिक उद्दिष्ट ७५ तर आर्थिक उद्दिष्ट ७.५० लाख रुपये निश्चित आहे. बीजभांडवल योजनेसाठी रु. ७,००,००० प्रकल्प रक्कमेसाठी भौतिक उद्दिष्ट ७५ व आर्थिक उद्दिष्ट ५२५ लाख रुपये आहे. तसेच थेटकर्ज योजनेसाठी १ लाख प्रकल्प रक्कमेसाठी भौतिक उद्दिष्ट ७५ व आर्थिक उद्दिष्ट ७५ लाख रुपये निश्चित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने थेटकर्ज योजनेअंतर्गत अर्ज मागणी व दाखल करणे दि.८ जुलै २०२५ पासून सुरू झाले आहे. इच्छुक अर्जदारांनी दि.१० सप्टेंबर २०२५ पर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) जिल्हा कार्यालय,डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,मध्यवर्ती प्रशासकीय इमारत जवळ,धाराशिव येथे अर्ज दाखल करावेत.त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, अशी माहिती जिल्हा व्यवस्थापक श्री.लक्ष्मण क्षीरसागर यांनी दिली.

# रब्बी हंगाम २०२५-२६ : शेतकरी गटांना पिक प्रात्यक्षिकांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

धाराशिव, (जिमाका)- रब्बी हंगाम २०२५ -२६ मध्ये गहू, कडधान्ये, पौष्टिक तृणधान्ये,ऊस,करडई, मोहरी व सूर्यफुल या पिकांच्या उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पीक प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

हा कार्यक्रम राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान (अन्नधान्य व वाणिज्यिक पिके) तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया) अंतर्गत राबविण्यात येत असून, यातून शेतकरी गटांना थेट लाभ मिळणार आहे.

पिक प्रात्यक्षिकांसाठी पात्रता निकषांनुसार, दि.३१ मार्च २०२४ पूर्वी कोणत्याही शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत शेतकरी गट,शेतकरी उत्पादक कंपन्या व कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था यांना लाभ देण्यात येईल.याकरिता गटाने प्राधिकृत सदस्यामार्फत महाडीबीटी पोर्टलवर (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/-griLogin/-griLogin) अर्ज करता येतील. अर्ज प्रक्रिया दि.२ सप्टेंबर २०२५ पासून सुरू झाली असून,गटांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्वावर होणार आहे.

अर्ज करताना महाडीबीटी पोर्टलवरील बियाणे वितरण, प्रात्यक्षिक,फ्लेक्सी घटक,औषधे आणि खते या टाईल अंतर्गत अर्ज सादर करावा.शासन धोरणानुसार लाभ घेणाऱ्या सदस्यांचा Farmer ID असणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त शेतकरी गटांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जवळच्या कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा,असेही कळविण्यात आले आहे.

# माजी सैनिक,पत्नी व पाल्यांसाठी 'विशेष गौरव पुरस्कार योजना अर्ज करण्याची अंतिम तारीख १० सप्टेंबर

धाराशिव, (जिमाका)- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धाराशिवमार्फत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माजी सैनिक,त्यांच्या पत्नी व पाल्यांना विशेष गौरव पुरस्कार योजनेअंतर्गत एकवेळ आर्थिक मदत देण्यात येणार आहे.

या योजनेत खेळ,शैक्षणिक क्षेत्र, सामाजिक कार्य,पर्यावरण संवर्धन, यशस्वी उद्योजकता तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये केलेल्या बहुमोल कार्यासाठी पात्र लाभार्थ्यांचा सन्मान केला जाणार आहे.

विशेषतः शैक्षणिक क्षेत्रात सन २०२४ -२५ मध्ये १० वी व १२ वीच्या परीक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे पाल्य,तसेच IIT, IIM, AIIMS सारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रवेश मिळविलेले माजी सैनिकांचे पाल्य या योजनेस पात्र ठरणार आहेत. त्याचबरोबर खेळ क्षेत्रात राष्ट्रीय,राज्यस्तरावरील किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी केलेले, साहित्य, संगीत, नृत्य,गायन, वादन आदी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेले,तसेच कृषीक्षेत्रात भरघोस उत्पन्न घेणारे माजी सैनिक शेतकरी यांचाही गौरव करण्यात येणार आहे.

या योजनेसाठी इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धाराशिव येथून घ्यावेत व १० सप्टेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत,असे आवाहन स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे (नि.),जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

# सभासदांचा विश्वास हाच आमचा श्वास : डॉ. स्मिता शहापूरकर

## प्रियदर्शिनी इंदिरा गांधी महिला सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात



धाराशिव, धाराशिव (प्रतिनिधी)-मागील पाच वर्षांत प्रियदर्शिनी इंदिरा गांधी महिला सहकारी पतसंस्थेने अल्पावधीत केलेली प्रगती ही केवळ आर्थिक शिस्तीची फलश्रुती नसून, सभासदांच्या निष्ठा व संचालक मंडळाचा प्रामाणिक प्रयत्नांचा परिणाम आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्राहकाभिमुख योजना, तसेच भविष्यात नैसर्गिक आपत्ती मदत निधी व शैक्षणिक मदत निधी उभारला जाणार आहे.हे केवळ आर्थिक व्यवहारा पुरते मर्यादित न राहता समाजहित देखील साध्य होणार आहे. संस्थेच्या सभासदांचा विश्वास हाच आमचा श्वास असल्याचे प्रतिपादन प्रियदर्शिनी इंदिरा गांधी महिला सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष डॉ. स्मिता शहापूरकर यांनी केले.

प्रियदर्शिनी इंदिरा गांधी महिला सहकारी पतसंस्थेच्या पाचव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन रविवार, ७ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता आयोजन केले होते. त्या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्ष म्हणून बोलत होत्या. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था धाराशिवचे सहाय्यक निबंधक अंबिलपुरे यांनी सभेचे उद्घाटन केले. सचिव डॉ. ज्योती कानडे यांनी अहवाल व आर्थिक पत्रके सादर केली. संस्थेच्या कामकाजाबाबत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यावर भर देण्यात आला.

कार्यक्रमात धाराशिव जिल्हा पत्रकार संघ व नगर वाचनालय धाराशिवच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष देवीदास पाठक, नगर वाचनालयचे अध्यक्ष तथा मसापचे अध्यक्ष नितीन तावडे, उपाध्यक्ष इतिहास संशोधक डॉ. सतिश कदम, सहकार खात्याचे प्रशिक्षक मधुकर जाधव यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेच्या उत्कृष्ट सभासद, ग्राहकांचा सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात प्रियदर्शनी इंदिरा गांधी पुरस्कार देण्याचा ठराव जाहीर करण्यात आला. यंदाचा पहिला पुरस्कार कवी, पत्रकार रवींद्र केसकर, कवयित्री भाग्यश्री वाघमारे-केसकर, सफल केसकर आणि प्रबल केसकर यांना प्रदान करण्यात आला. डॉ. स्मिता शहापूरकर यांनी केसकर कुटुंबीयांची घेतलेली मुलाखत भावपूर्ण ठरली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पतसंस्थेच्या अध्यक्ष डॉ. स्मिता शहापूरकर यांनी केले. यावेळी पतसंस्थेच्या सचिव डॉ. ज्योती कानडे आणि संचालक सुरेखा काशिद, पूनम जाधव, सुरेखा जगदाळे, रोहिणी नायगावकर, उषा वाडे, तज्ज्ञ संचालक धनंजय कुलकर्णी, व्यवस्थापक अलका वीर, सर्व कर्मचारी वर्ग व सभासद नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली. अत्यंत उत्साहात सभा पार पडली.

प्रियदर्शिनी इंदिरा गांधी महिला सहकारी पतसंस्थे मध्ये एकूण ७७ लाख ६० हजारांच्या ठेवी तर ५५ लाख रूपयांचे कर्ज देण्यात आले आहे. संस्थेचे एकूण ७६८ सभासद असून वसुल भाग भांडवल १२ लाख ५४ हजार आहे. या संस्थेचा एन.पी.ए.चे प्रमाण ०.५९ टक्के आहे. तर संस्थेचा ऑडीट वर्ग अ आहे. पुढील काळात संस्थेमध्ये लॉकर्स सुविधा, सोने तारण, विस्तारीत कक्ष आदी सुविधा देण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे.

# जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ ;जिल्हा व राज्यस्तरीय निवड स्पर्धा ; ऑनलाईन नोंदणीची अंतिम तारीख ३० सप्टेंबर

धाराशिव (जिमाका)- जागतिक कौशल्य स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्ठता स्पर्धा असून,ती दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते.२३ वर्षांखालील तरुणांना आपली कौशल्ये प्रदर्शित करण्याची ही एक प्रतिष्ठेची संधी असून तिला कौशल्यांची ऑलिम्पिक म्हणूनही ओळखले जाते.पुढील ४८ वी जागतिक कौशल्य स्पर्धा दि.२२ ते २७ सप्टेंबर २०२६ दरम्यान शांघाई (चीन) येथे होणार आहे.

या स्पर्धेसाठी जिल्हा,विभाग,राज्य व देशस्तरावर पूर्वनिवड स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,सेक्टर स्किल कॉन्सिल तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने ही स्पर्धा राबविली जात आहे.उमेदवारांनी स्पर्धेसाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा महत्त्वाचा निकष असून, उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असावा.तर Digital Construction, Cloud Computing,-dditive Manufacturing,Cyber Security,ICT Network Infrastructure,Industrial Design Technology,Industry 4.0, Mechatronics,Robot System Integration आदी विशिष्ट क्षेत्रांसाठी जन्म तारीख १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरची असणे आवश्यक आहे.

ITI, Polytechnic, MSME Tool Rooms, CIPET,IIT, Engineering Colleges, Maharashtra State Skill University,MSBVET, Fine -rt Colleges,Jewelry Making Institute, प्रशिक्षण संस्था,कौशल्य व व्यावसायिक शिक्षण संस्था आदी सर्व शैक्षणिक व प्रशिक्षण संस्थेतील उमेदवारांनी या स्पर्धेत उत्साहाने सहभागी व्हावे,असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव यांनी केले आहे.

# सोमनाथ कसबे यांचा धाराशिव येथे लहुजी शक्ती सेनेकडून सत्कार



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील लहुजी शक्ती सेना संघटनेचे राज्य प्रवक्ता प्रा. डॉ. मारुती अभिमान लोंढे यांच्या शुभहस्ते सामाजिक कार्यकर्ते श्री सोमनाथ कसबे यांचा लहुजी चौक धाराशिव येथे सत्कार करण्यात आला.

श्री सोमनाथ कसबे यांनी शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून गोरगरीब विद्यार्थ्यांना मदत करून शिक्षणाच्या प्रवाहात आणल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा.डॉ.लोंढे म्हणाले की, सोमनाथ कसबे यांचे कार्य अत्यंत मोठे आहे.अशाच प्रकारचे कार्य आपण सर्व लोकांनी मिळून केल्यास शिक्षणापासून वंचित असलेला वर्ग शिक्षण घेऊ शकेल यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

यावेळी श्री प्रवीण खरबस , निकी गावचे सरपंच दादासाहेब मोरे आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KOTWAL SOHEL AHEMED ALI.** TO: **SOHEL AHEMEDALI KOTWAL.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SOHEL AHEMEDALI KOTWAL** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KOTWAL SOHEL AHEMED ALI.**
NEW NAME:- **SOHEL AHEMEDALI KOTWAL.**
Address :- SHIRIN COLONY, OSMANABAD.413501.
Adhar no.-263886951008. Mob. No.-8806525217



**लातूर समाचार उस्मानाबाद**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649